# An evening in Aurangabad..

# AURA 2013
## AURANGABAD

Regular concert series of Indian Classical dance showcasing the rich and diverse heritage of Aurangabad region.

**Every Friday, Saturday, Sunday; 7.30-8.30 pm at MAHAGAMI Gurukul, MGM, Aurangabad.**



A unique dance concert series named AURA-Aurangabad is being launched which aims to showcase the rich and diverse heritage of Aurangabad through Indian classical dance performances. This series catering to the cultural quest of the tourists and guests visiting the city being presented at MAHAGAMI will bring to life this wide spectrum of legends, master-pieces and monuments through the Indian classical dance forms like Kathak, Odissi, Bharatnatyam, Mohiniattam, Kuchipudi, etc. Curated by

Parwati Dutta
(Director, MAHAGAMI)



presented by
MAHAGAMI

supported by
CII
Confederation of Indian Industry

Platinum sponsor
BAGLA Total Solution

Silver sponsor
Endress+Hauser
People for Process Automation

**For bookings or enquiry,**
call +91 9372093189, +91 240 2484919.
(Time - 10.00 am to 6.00pm)
Information also available in Local Hotels,

Follow us on Facebook
AURA-Aurangabad

# Aura Aurangabad 2013-14 (SCHEDULE)

29 Nov 2013 | Kathak| MAHAGAMI Ensemble| Aurangabad

30 Nov 2013 | Mohiniattam | Sujatha Nair & Jayashree Nair | Mumbai

01 Dec 2013 | Mohiniattam | Sujatha Nair & Jayashree Nair | Mumbai

6 Dec 2013 | Kathak | Amruta Gogate | Pune

07 Dec 2013 | Bharatnatyam | Smt. Arundhati Parwardhan Kalavardhini truop | Pune

08 Dec 2013 | Bharatnatyam | Nrithyodaya | Mumbai

13 Dec 2013 | Bharatnatyam | Aayam Dance and research Centre | Pune

14 Dec 2013 | Odissi | Smitalay | Mumbai

15 Dec 2013 | Odissi | Smitalay | Delhi

20 Dec 2013 | Odissi | Anita Babu | Delhi

21 Dec 2013 | Kathak | Smt. Apoorva Baksh | Mumbai

22 Dec 2013 | Bharatnatyam | Swati Vijay Kumar& Group | Mumbai

27 Dec 2013 | Bharatnatyam | Sarfojiraje Bhosale Centre | Mumbai

28 Dec 2013 | Bharatnatyam | Sarfojiraje Bhosale Centre | Mumbai

29 Dec 2013 | Bharatnatyam | Sarfojiraje Bhosale Centre | Mumbai

03 Jan 2014 | Bharatnatyam | Pavitra Art Visual Institute | Mumbai

04 Jan 2014 | Odissi | Kaishiki Nrityabhasha | Mumbai

05 Jan 2014 | Kathak | Prajakta Dravid and Tejaswini Sathe | Pune

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, THURSDAY 28 NOVEMBER 2013

Aurangabad FIRST
PAGE 5

# Aura dance concert series from tomorrow

LOKMAT NEWS NETWORK
AURANGABAD, NOV 27

**Apart from Mahagami and local artistes, the series will feature dance performances by other groups from all over India**

MGM's Mahagami and Confederation of Indian Industry (CII) are going to hold a unique dance concert series named Aura-Aurangabad from November 29 to January 5.

This dance concert series aims to showcase the rich and diverse heritage of Aurangabad through Indian classical dance performances.

Aurangabad region is filled with the legends of Shiva, Dashavtar, Ramayan, Mahabharat, Buddha, Mahavir in the form of sculptors and

Aurangabad region is filled with the legends of Shiva, Dashavatar, Ramayan, Mahabharat, Buddha in the form of sculptors and paintings. It is also the home to Ajanta-Ellora caves, Bibi-ka-Maqbara, Daulatabad fort and Ghrishaneshwar temple.

paintings. It is also home to Ajanta-Ellora Caves, Bibi-ka-Maqbara, Daulatabad Fort and Ghrushneshwar Temple.

The dance concert series will bring to life this wide spectrum of legends and monuments through classical dance forms like Kathak, Odissi, Bharatnatyam, Mohiniattam, Kuchipudi.

The concept is created by Parwati Dutta, director, Mahagami. It will be held from November 29 to January 5 on every Friday, Saturday and Sunday, at Mahagami from 7.30 pm to 8.30 pm.

In addition to Mahagami and local artistes, dance performances by other groups from all over India will take place. They are Mohiniattam by Sujatha Nair and group (Mumbai), Bharatnatyam by Dr Sucheta Chapekar and group (Pune), Anand Satchidananda (Chennai), Dr Sandhya Purech and group (Mumbai), Odissi by Anita Babu and group (Delhi), Jhelum Paranjape and group (Mumbai) and Daksha Mashruwala and group (Mumbai).

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, SATURDAY 30 NOVEMBER 2013

Aurangabad FIRST
PAGE 6



A group of Kathak dancers performs in 'Aura Aurangabad' programme on MGM campus on Friday.






महागामी, सीआयआय व औरा संस्थेचा उपक्रम

## शहरात नृत्य महोत्सव

**औरंगाबाद** : महात्मा गांधी मेमोरियल कॉलेजच्या 'महागामी' (महात्मा गांधी मिशन संगीत अकादमी) गुरुकुल, औरा आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री यांच्या संयुक्त विद्यमाने २९ नोव्हेंबरपासून प्रत्येक शुक्रवारी, शनिवारी आणि रविवारी संध्याकाळी ७.३० ते ८.३० वाजता भरतनाट्यम, मोहिनी अट्टम, कथ्थक, कुच्चीपुडी, ओडिसीसारखे भारतीय शास्त्रीय नृत्य सादर करण्यात येणार आहे.

वेरूळ, अजिंठा येथील गुंफामधील पेंटिंग आणि मूर्ती यांच्यातील शिवा, दशावतार, रामायण, महाभारत, बुद्धा, महावीर यांच्या काळातील नृत्य सादर करून औरंगाबादकर व येथे येणाऱ्या पर्यटकांची मेजवानी करण्यात येणार आहे, असे महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी म्हटले आहे.

पहिल्या सादरीकरणात देवगिरी बिलावल, शिव-वसंत, रामायण, निर्झरिणी आपली कला सादर करतील. स्थानिक कलाकारांतर्फे भारतीय शास्त्रीय नृत्य सादर करण्यात येणार आहे. तसेच पुणे, चेन्नई, दिल्ली, मुंबई, येथील कलाकारही या महोत्सवात भाग घेऊन आपली कला सादर करणार आहेत. अधिक माहितीसाठी औरा संस्थेशी संपर्क साधता येईल.

स्थानिक कलाकारांतर्फे भारतीय शास्त्रीय नृत्य सादर करण्यात येणार आहे. तसेच पुणे, चेन्नई, दिल्ली, मुंबई येथील कलाकारही या महोत्सवात भाग घेऊन आपली कला सादर करणार आहेत.



# औरंगाबाद TODAY

कथ्थक नृत्योत्सव



औरंगाबाद : महात्मा गांधी मिशन संगीत अकादमी 'महागामी'तर्फे शनिवारी 'महागामी'च्या परिसरात कथ्थक नृत्योत्सवात ख्यातनाम नृत्य कलाकार लीना मालकर-विज, हरिदेव रे, पौर्णिमा रॉय चौधरी यांच्या कथ्थक नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. या नृत्योत्सवातील नृत्याविष्कार.

FRIDAY 29 NOVEMBER 2013 AURANGABAD TIMES OF INDIA 3

# An evening of enthralling performances



A Kathak recital in progress

A cultural event, was recently held in the city where various Kathak recitals were performed. Organised by the Mahagami Mahatma Gandhi Mission Sangeet Academy, the event was well received by the audiences.

Participants included dancers from the Nritya Manan group from Delhi. The evening began with the Ganesh Vandana, followed by Shiv Vandana, Dusavatar and Tarana among others. **Leena Malakar Vij, Hridev Ray** and **Purnima Roy Chowdhury** were among the performers. **Raju Kadam**, the manager of Mahagami said, "Kathak is derived from the dance dramas of ancient India and the word means to tell a story. It is a major classical Indian dance form. At this event the emphasis was not just on narrating religious stories but also on entertainment."

— Abhinay Deshpande.

FRIDAY 20 DECEMBER 2013 AURANGABAD IS TALKING ABOUT AURANGABAD TIMES OF INDIA 3

Pics: Abhinay Deshpande

# Of cultural performances, legends and holistic entertainment



A dance recital

The city witnessed a unique classical dance concert recently. The concert was presented by Mahatma Gandhi Mission's MAHAGAMI Gurukul with the support of Confederation of Indian Industry. The performances on display included a Bharatanatyam concert by **Arundhati Patwardhan** and two of her senior disciples **Saili Pawar** and **Sonali Shawale** who together performed the Ardhanarishwara Pushpanjali, Dashavatar, Kalinga Narana Tillana and Abhanga.

"This unique dance performance series catering to the cultural quest of the tourists and guests visiting the city brought to life a wide spectrum of legends, masterpieces and monuments through the Indian classical dance forms like Kathak, Odissi, Bharatnatyam, Mohiniattam, Kuchipudi, etc," said **Parwati Dutta**, director of the event.

Many tourist from different countries like Germany, Japan and Thailand came to see the dance performances and were seen enjoying it.

— Abhinay Deshpande



Arundhati Patwardhan



Sonali Shawale



Audiences enjoying the performances

A cultural event was recently held in the city where various Kathak recitals were performed. Kathak is derived from the dance dramas of ancient India and the word means to tell a story. It is a major classical Indian dance form.

औरंगाबाद
महाराष्ट्र टाइम्स
www.maharashtratimes.com
औरंगाबाद ■ शनिवार, २८ डिसेंबर २०१३
www.facebook.com/abdmata
३

# तालबद्ध नृत्याने रंगले 'कौतुकम्'

**'औरा-औरंगाबाद' नृत्य कार्यक्रम**

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

ब्रह्मा, विष्णू आणि नटराजाची प्रार्थना 'कौतुकम्' या तालबद्ध नृत्यात सादर करीत सरफोजीराजे भोसले सेंटरच्या युवा नृत्यांगणांनी रसिकांना शास्त्रीय नृत्याची नवी अनुभूती दिली. महागामी संस्थेच्या परिसरात शुक्रवारी झालेल्या 'औरा-औरंगाबाद' नृत्यशृंखलेत नवोदित कलाकारांनी प्रतिभेचे रंग भरले.

सीआयआय आणि एमजीएम संस्थेच्या वतीने 'औरा-औरंगाबाद' नृत्यशृंखलेत मुंबईच्या सरफोजीराजे भोसले कल्चर सेंटरच्या विद्यार्थिनींनी शुक्रवारी सादरीकरण केले. नृत्य संस्कृती संवर्धनासाठी ही संस्था नऊ वर्षांपासून कार्यरत आहे. भरतनाट्यम कलावंत डॉ. संध्या पुरेचा यांच्या सहा विद्यार्थिनींनी शास्त्रीय नृत्याची बरसात केली. 'गणेशस्तुती'ने कार्यक्रमाला सुरुवात झाली. 'आदी'तालातील राग नातईवर नृत्याविष्कार सादर झाला. त्यानंतर 'कौतुकम्' या पारंपरिक नृत्य प्रकारात ब्रह्मा, विष्णू आणि नटराजाची आराधना कलाकारांनी केली. नटराजाचे तांडव नृत्य पाहताना रसिकांचे भान हरपले होते. तर ब्रह्मा-विष्णूची आराधना करताना मांगल्यमय वातावरणात उत्कट नृत्यरचना सादर करण्यात आल्या. 'जतीस्वरम' प्रकारात शिव-पार्वती, कृष्ण-गोपिका आणि दशावतार सादर झाले. 'राग खमाज'मधील या रचनांना चांगली दाद मिळाली. पदलालित्य, हस्तमुद्रा आणि मुद्राभिनयातून कलाकारांनी प्रत्येक रचना देखणी केली. त्यानंतर महाप्रभू श्रीमद् वल्लभाचार्य रचित 'मधुराष्टकम्'मध्ये चराचरात सामावलेल्या ईश्वराची आराधना सादर झाली. अधरम मधुरम, वंदनम मधुरम्, नयनम मधुरम्, हसितम मधुरममधून ही रचना अधिकाधिक उलगडत गेली.

'मल्लिका' रागातील 'महालक्ष्मी अष्टकम्'मधून लक्ष्मीदेवीचे महात्म्य दाखवण्यात आले. 'तिल्लाना' आणि 'मंगलम'ने सांगता झाली. यात चित्रा दळवी, राधिका पाटकर, पुष्करा देवचक्के, मंदिरा जोशी, सुहानी धनकी व दिशा वाघेला यांनी सादरीकरण केले. कार्यक्रमाला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**शास्त्रीय नृत्याची मोहिनी**

'औरा-औरंगाबाद' उपक्रमात पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. भरतनाट्यम, कथ्थक, ओडिसी, मोहिनीअट्टम या भारतीय नृत्याची पर्यटक व विद्यार्थी चौकसपणे माहिती घेत आहेत. तसेच उत्तम रचनांना मनापासून दाद देत आहेत. शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमाला विदेशी व परराज्यातील पर्यटक उपस्थित होते.

'औरा-औरंगाबाद' उपक्रमात पर्यटकांची गर्दी वाढली आहे. भरतनाट्यम, कथ्थक, ओडिसी, मोहिनीअट्टम या भारतीय नृत्याची पर्यटक व विद्यार्थी चौकसपणे माहिती घेत आहेत.

TIMES CITY
THE TIMES OF INDIA, AURANGABAD | MONDAY, DECEMBER 2, 2013

## SHOWCASING ART



The Upasana academy of fine arts, Mumbai, presents Mohiniattam on Saturday at a dance concert series named 'AURA-Aurangabad' which started on Friday

औरंगाबाद टाइम्स
गुरुवार, २८ नोव्हेंबर २०१३
३

# शास्त्रीय नृत्यमैफलींचा उद्यापासून नजराणा

## महागामीत 'औरा-औरंगाबाद'ची स्थापना ; विविध नृत्यांगनांची उपस्थिती

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

पारंपरिक शास्त्रीय नृत्यशैलीची आगळीवेगळी संकल्पना मांडत 'औरा-औरंगाबाद'ची स्थापना महागामीतर्फे करण्यात येत आहे. या संकल्पनेवर आधारित यापुढे २९ नोव्हेंबर पासून ५ जानेवारीपर्यंत दर शुक्रवारी, शनिवारी व रविवारी संध्याकाळी ७.३० ते ८.३० वाजेपर्यंत महागामीत नृत्य होणार आहे. याची सुरूवात २९ नोव्हेंबरला कथ्थक सादरीकरणातून होईल.

या नृत्यमैफलीच्या मालिकेत कथक, ओडिसी, भरतनाट्यम, मोहिनीअट्टम, कुचिपुडी आदी विविध नृत्यप्रकार रसिकांना अनुभवता येणार आहे, ही सर्व संकल्पना पार्वती दत्ता यांची आहे. २९ नोव्हेंबरला होणाऱ्या कार्यक्रमात बारा ज्योर्तिलिंगांचे सादरीकरण होईल. या शिवाय देवगिरी,



बिलावल, शिवा-वसंत, रामायण, निरजारिणी या संकल्पांचेही सादरीकरण होईल. याचे सादरीकरण महागामीतील मुली करतील.

५ जानेवारी २०१४ पर्यंत होणाऱ्या ह्या नृत्यमालिकेत स्थानिक आणि बाहेरील मोठ्या कलावंतही उपस्थिती लावणार आहेत.

महिने सुरू असलेल्या नृत्य मालिकेचे मुख्य आकर्षण सुजाता नायर व समूह(मुंबई) (मोहिनीअट्टम) ; डॉ. सुचेता चापेकर व समूह (भरतनाट्यम)( पुणे); अनिता बाबू व समूह (ओडिसी) (दिल्ली); झेलम परांजपे व समूह (ओडिसी) (मुंबई), दक्षा मशरूवाला (मुंबई) यांचे असेल. यासंबंधी अधिक माहितीसाठी ९३७२०९३१८९ व ०२४०-२४८२९१९

या क्रमांकावर संपर्क साधता येईल. या शिवाय यासाठी खास सोशल नेटवर्किंगचा आधार घेतला जात असून रसिकांनी Facebook (AURA-Aurangabad - https://www.facebook.com/AuraAurangabad यावरही संपर्क साधू शकतात.

या नृत्य मालिकेला द कान्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) यांचे सहकार्य लाभले आहे.

औरंगाबाद | महाराष्ट्र टाइम्स | www.maharashtratimes.com | औरंगाबाद ■ सोमवार, ९ डिसेंबर २०१३ | www.facebook.com/abdmata | ३

# 'सुंदर ते ध्यान'... 'अबीर गुलाल..'

## सविता व नागराज यांच्या भरतनाट्यमने रसिक मंत्रमुग्ध



**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी....'; 'अबीरगुलाल उधळीत रंग....' ;'नाचत आले गणपती...' ह्या व अशा एकापेक्षा एक अभंग, पुष्पांजली व आनंदानाट्यमवर आधारीत सरस नृत्यांचे सादरीकरण भरतनाट्यमद्वारे करण्यात आले. महागामीतील 'औरा-औरंगाबाद'मध्ये रविवारी सादर करण्यात आलेल्या भरतनाट्यममधून जयश्री राजगोपालन यांचे शिष्य सविता आणि नागराज रसिकांना खिळवून ठेवले.

यात सुरूवातीला 'पुष्पांजली'सादर करण्यात आली. यातून रसिकांचे स्वागत व वंदन यावर आधारित भरतनाट्यम सादर करण्यात आले. राग व ताल मलिकातून पारंपरिक भरनाट्यमचा अविष्कार काय असतो हे सुरूवातीला दाखवण्यात आले. आनंदनटनमद्वारे देवी पारशक्तीची नृत्य चित्रण अतिशय सुरेखपद्धतीत उतरवण्यात आले. उत्तम 'ओमकार' करताना पृथ्वी, आकाश, अग्नि, हवा आणि पाणी यांनाही कशापद्धती विचलित करू शकते हे पारशक्तीच्या नृत्यातून दाखवण्यात आले. याशिवाय याचे सादरीकरण करताना पूजा, धनुष्य आणि ब्रह्मांडीय पद्म यांचा भरतनाट्यममध्ये कसा उपयोग होऊ शतोक हे 'आनंदनटनम' मधून रसिकांना दाखवण्यात आले. 'भूतगण' आणि 'इतर' यांचा पाडाव 'नृत्य' आणि 'भक्तां'च्या प्रभावाखाली कसे होऊ शकते हे या नृत्यसादरीकरणातून सादर केले गेले. हे सादरीकरण राग 'कंबोजी' आणि 'आदी ताला'वर आधारित होते.

'अलीनोडलू राम' या कन्नड 'पुराणदारसदा'द्वारे लिखित काव्यावर राग 'नटकुरणजी' आणि 'आदी तालावर' भरतनाट्यमद्वारे रामायणातील एक कथा प्रस्तुत केली गेली. रावण युद्धमैदानात येतो, हे पाहून वानरसेना भयकंपित होते व पळायला लागते. हे घडत असतानाच राम तिथे येतात आणि सारे जण सभोवताली रामालाच पाहू लागतात. हे लाघवी-व विचित्र स्वरूप पाहून आसूर आपसातच भांडू लागतात व एकमेकांना मारतात. यानंतर वानरसेना जिंकल्याचा आनंद सादर करतात अशी ही काव्यात्मक कथा नृत्याद्वारे सादर करण्यात आली. या नंतर सादर करण्यात आलेल्या नृत्यप्रकारात 'अबीर गुलाल उधळीत रंगऽऽ' या अभंगावर आधारित भरतनाट्यममधून अद्वैताचे सारे कथासार दाखवण्यात आले. वारकरीपंथाचे तत्त्व भगवंतासमोर सारे एकच त्याच्यासमोर कुणी मोठं नाही कुणी छोटं नाही, कोणी उच्च नाही कुणी नीच्च नाही हे राग मलिका व एक तालातून सुरेख नृत्याद्वारे सादर करण्यात आले. 'नाचत आले गणपती' हे संत तुकारामांच्या अभंगातून गणेशाचे विविध रूपांचे सादरीकरण झाले. मिश्र वृंदावनी रागातून व आदी तालाच्या आधारावर हे प्रस्तुत झाले. 'सुंदर ते ध्याऽऽऽन' या संत तुकारामांच्याच अंभगातून आदी ताल व भुपाली रागाचा आधार घेत शेवटचे 'सुंदर ते ध्यान' हे नृत्य रसिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडून गेले.

### शनिवारी झाले दशावताराचे दर्शन

आंध्र प्रदेशातील सतराव्या शतकातील रचनाकार उत्तू काडू भागवताई यांनी तालाची चमत्कृती आणि गतिभेद याचा सुरेख संगम साधून रचलेली 'कलिंग नर्तन तिल्लाना' ही कलाकृती पुणे येथील प्रख्यात भरतनाट्यम नृत्यांगना अरुंधती पटवर्धन यांनी सायली पवार आणि सोनाली शेवाळे यांच्या साथीने सादर केली.'विष्णू अवतार'चे सादरीकरण भरतनाट्यमचे अनोखे दर्शन घडविणारे होते. पुष्पांजलीने सादरीकरणाला सुरुवात झाली. 'गंभीर नटई' रागातील खंडचापू तालातील या रचनेतून भगवंताला पुष्पार्पण करण्यात आले.

कार्यक्रमात सुरुवातीला 'पुष्पांजली' सादर करण्यात आली. यातून रसिकांचे स्वागत व वंदन यावर भरतनाट्यम सादर करण्यात आले. राग व ताल मलिकातून पारंपारिक भरतनाट्यमचा अविष्कार काय असतो हे सुरुवातीला दाखवण्यात आले.




पवित्र आर्ट व्हीजवल इन्स्टिट्यूट मुंबई यांच्या समूहाने औरा-औरंगाबाद या महागामीच्या नृत्य उत्सवामध्ये अर्धनारीश्वर उमामहेश्वर स्त्रोत्र भरतनाट्यम नृत्यातून सादर केले. (छाया-राजेश मुलकेवार)

सकाळ औरंगाबाद TODAY

औरंगाबाद, शुक्रवार, २२ नोव्हेंबर २०१३ ८

# महागामीतर्फे उद्या कथ्थक नृत्योत्सव

**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. २१ : महात्मा गांधी मिशन संगीत अकॅडमी महागामीतर्फे शनिवारी (ता.२३) कथ्थक नृत्योत्सव होणार आहे. महागामीच्या द्यावा पृथ्वी खुल्या मंचावर सायंकाळी सात वाजता कार्यक्रम होईल.

दिल्ली येथील ख्यातनाम कथ्थक नृत्यांगना लीना मालकर वीज, पूर्णिमा रॉय चौधरी व हरिदेव रे यांचे कथ्थक नृत्य होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. याशिवाय कलास्नेही सदस्यता मोहीम सुरू असून वार्षिक कलास्नेही सदस्यता नोंदणी व नूतनीकरण सुरू आहे. अधिक माहितीसाठी (०२४०-२४८४९१९) या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन महागामीच्या संचालिका नृत्यगुरू पार्वती दत्ता यांनी केले आहे.



लावण्य आणि शक्तीचे वरदान लाभलेल्या महाकालीचे सुंदर वर्णन करणारी दुर्मिळ रचना आणि भरतनाट्यम सादरीकरणातून पौराणिक वारसा सांगत शास्त्रीय नृत्य कलावंतांनी 'औरा-औरंगाबाद' कार्यक्रम गाजवला.

औरंगाबाद Times of India

शनिवार, ४ जानेवारी २०१४ | २

# दुर्मिळ रचनांवर नृत्याविष्कार

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

लावण्य आणि शक्तीचे वरदान लाभलेल्या महाकालीचे सुंदर वर्णन करणारी दुर्मिळ रचना आणि भरतनाट्यम सादरीकरणातून पौराणिक वारसा सांगत शास्त्रीय नृत्य कलावंतांनी 'औरा-औरंगाबाद' कार्यक्रम गाजवला. शुक्रवारी सायंकाळी महागामी परिसरात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

'सीआयआय' आणि एमजीएम संस्थेच्या वतीने पर्यटनवृद्धीसाठी 'औरा-औरंगाबाद' नृत्यश्रृंखला आयोजित करण्यात आलीय. दर शुक्रवार ते रविवार दरम्यान हा उपक्रम सुरू आहे. यात शुक्रवारी मुंबई येथील पवित्र भट आणि शिष्यांनी भरतनाट्यम सादरीकरण केले. पुष्पांजलीने कार्यक्रमाला सुरूवात झाली. नटराज, गुरु, वादक आणि प्रेक्षकांना अभिवादन करीत कलाकारांनी दाद मिळवली. 'वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ' या श्लोकातून श्री गणेशाला वंदन करण्यात आले. या नृत्य प्रकारात हस्तमुद्रांचा उत्तम वापर कलाकारांनी केला. राधा, वाणी, अंजना, धन्या आणि अपूर्वा यांनी सादरीकरण केले. आदितालातील रचना अप्रतिम सादर झाली. त्यानंतर 'महात्रिपुरा सुंदरी' ही प्राचीन तामिळ रचना रसिकांना मोठी पर्वणी ठरली. जगातील सर्वात सुंदर देवतेची केलेली आराधना रसिकांसाठी नवी अनुभूती होती. महाकाली, मदुराई मिनाक्षी, अंबा, शक्ती, पार्वती अशा विविध नावांनी देवीची आराधना करतात. कुरळे केस, भावविभोर नयन आणि रत्नजडीत आभूषणांनी सजलेली देवी कलाकारांनी नृत्यातून साकार केली. यावेळी रसिकांनाही अलौकिक देवतेचे दर्शन घडले. मदुराई आर. मुरलीधरन यांनी संगीतबद्ध केलेली ही रचना उत्तमरीत्या सादर झाली. तर 'उमामहेश्वर स्तोत्रा'सह 'अर्धनारीश्वर' नृत्य प्रकार सादर झाला. शिवपार्वतीचे अधिष्ठान असलेल्या या नृत्यात कलाकारांनी बारकावे दाखवले. जगाच्या नवनिर्मितीत शिवाचे अढळ स्थान आहे. अर्धनारीश्वर हे त्याचे प्रातिनिधीक प्रतीक अनेकांना मोहीत करणारे ठरले. उजव्या अर्ध्या भागात शिव आणि डाव्या अर्ध्या भागात पार्वतीचे दर्शन घडवणारे नृत्य अनेकांना मंत्रमुग्ध करुन गेले. वाणी आणि जितेश यांनी रचनेत उत्तम सादरीकरणाचा आविष्कार घडवला. रुपक तालातील रचना मुथूस्वामी दीक्षितार यांनी संगीतबद्ध केली होती. तर 'तिल्लाना' या पारंपरिक प्रकाराने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. पल्लवी-अनुपल्लवीचा अप्रतिम वापर हे तिल्लानाचे वैशिष्ट्य ठरले. राग 'धनश्री' आणि आदितालातील रचना रसिकांना विशेष भावली. उत्तम वेशभूषा आणि आकर्षक प्रकाशयोजनेमुळे 'औरा-औरंगाबाद' कार्यक्रम कलाकारांनी संस्मरणीय केला. यात पवित्र यांचे शिष्य सहभागी झाले होते. कार्यक्रमाला महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता उपस्थित होत्या.

**'औरा-औरंगाबाद' उपक्रमाला प्रतिसाद**




**प्रतिसाद वाढला**

'औरा-औरंगाबाद' उपक्रमाला प्रतिसाद मिळत असून यात सातत्याने वाढ होत आहे. काही पर्यटन व्यावसायिकांनी यात स्वारस्य दाखवले आहे. त्यामुळे देशी-विदेशी पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. भारतीय शिल्पकला पाहिल्यानंतर नृत्यकला अनुभवण्यासाठी काही पर्यटक येत आहेत.

**औरा-औरंगाबाद**

'सीआयआय' आणि 'एमजीएम' संस्थेच्या वतीने महागामी परिसरात 'औरा-औरंगाबाद' नृत्यशृंखला आयोजित करण्यात आली आहे. शुक्रवार, तीन जानेवारी रोजी मुंबईचे प्रसिद्ध भरतनाट्यम कलाकार पवित्र भट यांचे शिष्य सादरीकरण करणार आहेत. यात शास्त्रीय नृत्याच्या अनेक दुर्मिळ रचना सादर होणार असून रसिकांसाठी हा उत्तम कार्यक्रम आहे.

**शनिवार, स्थळ : महागामी, एमजीएम कॅम्पस,**
**वेळ : सायंकाळी सात**



हॅलो औरंगाबाद | शहर विशेष | लोकमत | औरंगाबाद, शनिवार, दि. ७ डिसेंबर २०१३ | ८

# औरा औरंगाबादचे चौथे पुष्प भावपूर्ण



महागामीच्या औरा औरंगाबादमध्ये चौथे पुष्प गुंफणाऱ्या कलाकार अमृता गोगटे यांचे कथ्थक सादरीकरण.

औरंगाबाद : ताल आणि लय यांना भाव असल्याची जाणीव औरा औरंगाबादमध्ये झालेल्या चौथ्या कार्यक्रमाने करून दिली. पुण्याच्या अमृता गोगटे या कलाकाराने साकारलेला सुंदर पदन्यास व चेहऱ्यावरील लाजवाब भाव यामुळे रसिक भारावून गेले. कमालीचा उत्साह व विविध भावमूर्ती दाखवून एकूण ५ नृत्य प्रकार अमृता यांनी सादर केले.

औरा औरंगाबादचे चौथे पुष्प गुंफण्यासाठी पुण्याच्या शांभवी दांडेकर यांची शिष्या अमृता गोगटे यांनी कथ्थक सादर केले. सादरीकरणातील पहिला नृत्य प्रकार पारंपरिक ध्रुपदामध्ये शिवस्तुती सादर झाली. त्रिपुरासुराचा वध, समुद्रमंथन यांचे सादरीकरण विशेष होते. त्यानंतर ११ ठेक्यांवर आधारित ताल रुद्राचे सादरीकरण थाट, अमाद, तोडा, परन, तत्कार यांच्या माध्यमातून अतिशय लोभनीय पद्धतीने झाले. कलाकाराच्या चेहऱ्यावरील भाव एवढे बोलके होते की, तालाच्या ११ ठेक्यांना जणू भावना असल्याचा भास करून देत होते. भगवान गौतम बुद्धांचे करुणामय रुप, तराऱ्यातील लवचिकता, चंचलपणा असो किंवा दानवांचा वध करणाऱ्या शंकराचे आक्रमक भाव अतिशय चपखलपणे व सहजतेने अमृता गोगटे यांनी सादर केले. कार्यक्रमाला कडाक्याच्या थंडीत नृत्याचा आनंद घेण्यासाठी आबालवृद्धांची उपस्थिती होती.

ताल आणि लय यांना भाव असल्याची जाणीव औरा औरंगाबादमध्ये झालेल्या चौथ्या कार्यक्रमाने करुन दिली. पुण्याच्या अमृता गोगटे या कलाकाराने साकारलेल्या सुंदर पदन्यास व चहऱ्यावरील लाजवाब भाव यामुळे रसिक भारावून गेले.

औरंगाबाद | महाराष्ट्र टाइम्स | aur.mtonline.in | औरंगाबाद ■ सोमवार, ३० डिसेंबर २०१३ | २ | www.facebook.com/abdmata

# नवचैतन्य निर्मितीचे 'सप्ततांडव'

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

भरतनाट्यमचा महत्त्वाचा प्रकार असलेल्या 'वर्णम'च्या बहारदार सादरीकरणाने सरफोजीराजे भोसले सेंटर मुंबई येथील नृत्यांगणांनी 'औरा - औरंगाबाद' नृत्यश्रृंखलेत रसिकांना खिळवून ठेवले. दुर्मिळ शास्त्रीय नृत्य रचनांची देखणी पर्वणी देत रविवारी आठ नृत्य कलावंतांनी नृत्योत्सव साजरा केला. विशेषत: 'सप्ततांडव' सादरीकरणातून नवचैतन्य निर्माण केले.

सीआयआय आणि एमजीएम संस्थेच्या वतीने पर्यटनवृद्धीसाठी 'औरा-औरंगाबाद' नृत्यश्रृंखला आयोजित करण्यात आली आहे. रविवारी कार्यक्रमाला 'आदिताला'तील 'गणेशस्तुती'ने सुरूवात झाली. तर 'गणेश कौत्वकम'मध्ये चतुश्र एकतालात रंगमंचावर गणेशाचे सहजसुंदर दर्शन घडवले. मूषक व गणेशाची मुद्रा सहजसुंदर अभिनयातून कलाकारांनी खुलवली. हस्ताभिनय आणि मुद्राभिनयाचा अचूक संगम साधत तालबद्ध रचना सादर केली. या नृत्याला रसिकांनी मोठी दाद दिली. शिव-पार्वती, दर्पणसुंदरी, गोपी-कृष्ण व भगवान विष्णुचे आख्यान मांडणारे 'जतीस्वरम' जुन्या संगीतबद्ध रचनांमुळे प्रेक्षणीय ठरले. भरतनाट्यममधील 'वर्णम' या दुर्मिळ प्रकारालाही रसिकांनी दाद दिली. मुद्राभिनयावर आधारीत हा नृत्य प्रकार अविस्मरणीय ठरला.

**'औरा-औरंगाबाद' नृत्य कार्यक्रम**

'वर्णम'मध्ये राजा शिवाजीला केलेली प्रार्थना नावीन्यपूर्ण होती. 'अथना' रागातील व चतुश्र रुपकातील रचना श्रवणीय होती. 'भो शंभो' म्हणत भगवान शंकराची आराधना करणारा 'नृत्य पद' प्रकारही विशेष ठरला. ही आराधना करताना 'सप्ततांडव' सादर करण्यात आले. यात आनंद तांडव, संध्या तांडव, उमा तांडव, गौरी तांडव, कालिका तांडव, त्रिपुरा तांडव आणि संहार तांडवाचा समावेश होता. उत्तम प्रकाशयोजना आणि लयबद्ध नृत्यामुळे तांडव रसिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. 'रेवती' राग व आदितालातील ही नृत्य रचना अलौकिक पर्वणी होती. पारंपरिक 'तिल्लाना'ने कार्यक्रमाची सांगता झाली. सादरीकरणात चित्रा दळवी, मंदिरा जोशी, दिशा वाघेला, पुष्करा देवचक्के, राधिका पाटकर, शांती मोहंती, सुहानी धनकी व सौरभी पारकर या कलाकारांचा समावेश होता. उपक्रमाला रसिकांनी रविवारी विशेष गर्दी केली होती.



औरंगाबाद | महाराष्ट्र टाइम्स | www.maharashtratimes.com | औरंगाबाद ■ शनिवार, ३० नोव्हेंबर २०१३ | www.facebook.com/abdmata | २

## ‘औरा-औरंगाबाद’चे थाटात उद्‌घाटन

चंद्रकांत थोटे



मंद प्रकाश, सुगंधित धूपाची आभा आणि मिणमिणत्या पणत्यांची ज्योती अशा भारलेल्या वातावरणात कथकद्वारे अभिनित सुंदर पदन्यासातून ‘औरा-औरंगाबाद’चे शुक्रवारी थाटात उद्‌घाटन करण्यात आले. पारंपरिक शास्त्रीय नृत्यशैलीची आगळीवेगळी संकल्पना मांडत ‘महागामी’तर्फे ‘औरा-औरंगाबाद’ची स्थापना करण्यात येत असून, ‘महागामी’च्या संचालिका पार्वती दत्ता यांच्या शिष्यांनी शुक्रवारी सादरीकरण केले.

हॅलो औरंगाबाद | शहर विशेष | लोकमत औरंगाबाद, रविवार, दि. २२ डिसेंबर २०१३ | ८

# नृत्यातील मोहक भावांमुळे रसिक मोहित



**औरंगाबाद :** ऑरा औरंगाबाद या महागामीतर्फे आयोजित नृत्यसंध्येमध्ये शुक्रवारी अनिता बाबू यांच्या ओडिसी नृत्यातील पंचरसांच्या सादरीकरणामुळे उपस्थित रसिक भारावून गेले.

ऑरा औरंगाबादचे दहावे सादरीकरण महागामी येथे झाले. विख्यात ओडिसी नृत्यांगना दिल्ली येथील अनिता बाबू यांचे सादरीकरण झाले. तीन दशकांच्या रियाजानंतर अनिता बाबू यांनी अनेक सादरीकरण देश- विदेशांत केले व अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. नवरसांपैकी भाव प्रकट करणाऱ्या पंचरसांचे सादरीकरण त्यांनी नृत्याद्वारे केले. राम आणि सीतेच्या प्रेमभावांचे सादरीकरण त्यांनी शृंगाररसातून केले. राम जेव्हा त्यांच्या मित्रांचे किंवा स्नेह्यांचे प्रेम बघतो तेव्हा त्याचा करुणरस नृत्यातून सादर करण्यात आला. जेव्हा सीतेला रावणाने पळविले त्यावेळी पंचवटीतील सगळे वातावरणच भयानक होते. त्याचे सादरीकरण अनिता बाबू यांनी यावेळी केले. राम- रावणाचे युद्ध म्हणजे रौद्ररस व युद्धाच्या शेवटी शांतरसाचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर बरखा तन्वीर व उदिता घोष यांनी पल्लवी व नजा जमुना या नृत्यप्रकारांचे सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर अनिता बाबू यांनी महाकाली प्रकाराचे सादरीकरण केले. यामध्ये नजा जमुना व पंचरसांचे सादरीकरण रसिकांसाठी लक्षणीय ठरले.

औरा-औरंगाबाद या महागामी तर्फे आयोजित नृत्यसंध्येमध्ये शुक्रवारी अनिता बाबू यांच्या ओडिसी नृत्यातील पंचरसाच्या सादरीकरणामुळे उपस्थित रसिक भारावून गेले. तीन दशकांच्या रियाजानंतर अनिता बाबू यांनी अनेक सादरीकरण देश-विदेशात केले व अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले.

औरंगाबाद | महाराष्ट्र टाइम्स | www.maharashtratimes.com | औरंगाबाद ■ रविवार, ८ डिसेंबर २०१३ | www.facebook.com/abdmata | ३

# शिवस्तुती, तालरूद्र, बुद्धस्तुतीने रसिक मंत्रमुग्ध

## अमृता गोगटेने 'कथ्थक'द्वारे वेधले लक्ष्य

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**



'शिवस्तुती'ची 'महिमा'... 'तराणा'.... 'ताल रूद्र' अन् बुद्ध स्तुतीने कथक नृत्यांगना अमृता गोगटे हिने लक्ष्य वेधले, निमित्त होते महात्मा गांधी संगीत कला अकादमी (महागामी)त औरा-औरंगाबाद नृत्यमालिकेच्या दुसऱ्या आठवड्याच्या पहिल्या दिवसाचे.

शुक्रवारी पुण्याच्या अमृता गोगटे हिने रसिकांना मंत्रमुग्ध केले. शिवस्तुती ध्रुपद अंगाने सादर करताना शिवाच्या विविधांगी रूपाचं दर्शन यात घडवलं गेलं. यात समुद्रमंथनातील विविध प्रसंगात असलेल्या शिवाच्या 'मुद्रा' आणि 'मदन'चा वध (दाह) यात भगवान शिवाने निभावलेली 'भूमिका'यांचे सादरीकरण कथकद्वारे करताना 'ध्रुपद' अंगाने अतिशय सुरेखपणे मांडले गेले. 'तालरूद्र'सादर करताना 'ऱ्हीदम'च्या अकरा 'बिट्स' कशा असतात हे दाखवण्यात आले. यात 'थाट', 'आमाद','तोडा','परण', 'टक्कर' यांचा अत्यंत सुंदर मिलाफ पाहायला मिळाला. 'गतभाव'कथ्थक मधील अनोखा व विरळ असा प्रकारही सादर करण्यात आला. कोणत्याही काव्याच्या समर्थनाशिवाय लयबद्ध आणि संगीतचक्रावर आधारित रचना सादर करणे हा यातील भाव आहे. हा भाव रामायणातील जटायू मोक्ष या प्रसंगातून सादर करण्यात आला. रामायणातील सीताहरण व रावण-जटायू युद्धाचे प्रसंगाचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. 'तराणा' सादर करताना हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा आधार घेण्यात आला. 'देऽरेना'; 'तऽऽ नानाऽऽ';' नाऽऽदीरदिरदीर' असे तराणे 'संगीत' व 'ऱ्हीदम' यांच्या अनोख्या मिलाफात सादर करण्यात आले. देवी पार्वतीचे स्त्रीसुलभ किंवा सुंदर असे 'लस्य' आणि शिवाचे मर्दानी 'तांडव' अशा दोन वेगवेगळ्या नृत्यशैलींना याद्वारे मांडण्यात आले, सादर करण्यात आले. या दोन नृत्यशैलींना अनुभवताना रसिकांना आगळावेगळा अनुभव आला.

सिद्धार्थ गौतम यांच्या जीवनकार्य व बोधीसत्त्व यांचे सादरीकरण 'बुद्धस्तुती'तून करण्यात कलावंतांना मोठे यश आले. शुक्रवारी (दि.६ डिसेंबर) ला सादर करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या वेळी पार्वती दत्ता, सीआयआयचे सर्व पदाधिकारी व मान्यवरांसह नृत्यप्रेमी रसिकांची उपस्थिती होती.

औरा-औरंगाबादमध्ये गेल्या आठवड्यात कथ्थक, मोहिनीअट्टम सादर करण्यात आले होते. पार्वती दत्ता यांच्या शिष्या यांनी कथ्थक तर सुजाता नायर व अमृता शिवकुमार यांनी मोहिनीअट्टम सादर केले होते. या मालिकेसाठी सीआयआय, महागामीचे सहकार्य लाभत असून मागील आठवड्यात चीन, तैवान, मलेशिया, थायलंड येथील पर्यटकांनीही उपस्थिती लावली होती.

रविवार महाराष्ट्र टाइम्स
औरंगाबाद, १ डिसेंबर २०१३ ◆ पाने १६ (संवादसह) ◆ शहर आवृत्ती ◆ रुपये ३.००

## महागामीत 'मोहिनीअट्टम'



महागामीतील 'औरा-औरंगाबाद'मध्ये शनिवारी सुजाता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी 'मोहिनीअट्टम'मधून मोहिनी घातली.

वृत्त ■ ५

शनिवारी पुण्याच्या अमृता गोगटे हिने रसिकांना मंत्रमुग्ध केले. शिवस्तुती ध्रूपद आंगाने सादर करताना शिवाच्या विविधांगी रुपांच दर्शन यात घडवलं गेलं.

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र!
गुडमॉर्निंग औरंगाबाद
रविवार, दि. २९ डिसेंबर २०१३ | १

## भरतनाट्यम् नृत्यातून 'गणेश कौतुक'

### 'आज सोनियाचा दिवस'ची रसिकांना पर्वणी

औरंगाबाद, दि.२८ / प्रतिनिधी

राग नताई आणि ताल चतुरास्त्रमध्ये गणेश कौतुकम हे सरफोजीराजे भोसले सेंटर भारत कॉलेज ऑफ आर्ट आणि कल्चर मुंबई येथील डॉ. संध्या पुरेच्या यांच्या शिष्यांनी सादर केले. आज दि.२८ डिसेंबर शनिवार रोजी शिवपंच अक्षर खोज हे रसिक प्रेक्षकांसाठी भरतनाट्यम् नृत्याच्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला चित्रा दळवी, राधिका पाटकर, मंदिरा जोशी, सुहानी धानकी, सुरभी पारकर, शांती मोहन्ती यांनी सामूहिकरित्या गणेश कौतुकम हे गणेशाचे कौतुक भरतनाट्यम कलाद्वारे मांडले. त्यानंतर विष्णु कौतुकम. भगवान विष्णूची विविध लीलया रूपे आणि अवतार सादर करण्यात आले.

मुशुमरी पिल्लई यांनी विष्णूबद्दल कौतुक करताना ताल आदीमध्ये मत्स्य, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, बलराम, कृष्णा आणि कलनी असे विविध रूपे वेळोवेळी मानव कल्याणासाठी घेतले असे वर्णन केले आहे. त्यावर आधारित नृत्य करण्यात आले.







राजे सरफोजी भोसले यांनी भारतीय शास्त्रीय भरतनाट्यम नृत्याने ताल राग, रचना हे तेलगु, मराठी आणि तमिळ भाषेत तयार केलेल्या आहेत. दादागुरू आचार्य पार्वतीकुमार यांनी या नृत्यकलेवर 'तंजवर नृत्य प्रबंध' लिहिलेला आहे. पंडित दादागुरू यांनी कोरिओग्राफ केलेल्या 'आज सोनियाचा दिवस' या मराठी पदावर आणि राग रितीगोल व आदीताल मध्ये नृत्य कलाकारांनी महागामीच्या मंचावर नृत्य सादर केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधिका शेलार हिने केले.

पर्यटकांना नृत्य-संगीताच्या माध्यमातून अजिंठा, वेरुळच्या लेणीतील शिल्प, चित्रकला जिवंत स्वरुपात पहता यावी यासाठी सुरु केलेल्या औरा-औरंगाबाद उपक्रमामुळे शहराच्या पर्यटनवृद्धीमध्ये मोलाचा भर पडेल.

सकाळ औरंगाबाद TODAY
औरंगाबाद, गुरुवार, १२ डिसेंबर २०१३ ३

# औरा-औरंगाबादमुळे पर्यटनवृद्धीला चालना

## पार्वती दत्ता, ऋषी बागला यांना विश्वास

औरंगाबाद, ता. ११ : पर्यटकांना नृत्य-संगीताच्या माध्यमातून अजिंठा, वेरूळच्या लेणींतील शिल्प, चित्रकला जिवंत स्वरूपात पाहता यावी यासाठी सुरू केलेल्या औरा-औरंगाबाद उपक्रमामुळे शहराच्या पर्यटनवृद्धीमध्ये मोलाची भर पडेल, असा विश्वास महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता व सीआयएचे ऋषी बागला यांनी व्यक्त केला.

महात्मा गांधी मिशन नृत्य-संगीत अकादमी महागामी व सीआयएतर्फे २९ नोव्हेंबरपासून महागामीच्या परिसरात औरा - औरंगाबाद हा उपक्रम सुरू झाला आहे. एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम, सीआयएचे प्रदीप देशपांडे, डॉ. रेखा शेळके यांच्या उपस्थितीत बुधवारी (ता. ११) झालेल्या पत्रकार परिषदेत माहिती देताना पार्वती दत्ता म्हणाल्या, "औरंगाबादप्रमाणे खचितच अन्य शहरांना असा समृद्ध वारसा लाभला असावा. एकेकाळी हे शहर दक्षिणेचे सांस्कृतिक केंद्र होते. या शहराने अनेक संस्कृती अनुभवल्या आहेत. दिवसभर पर्यटनस्थळांना भेटी दिल्यानंतर सायंकाळी त्यांना दिवसभरात पर्यटनस्थळी पाहिलेल्या शिल्प, वास्तू, चित्रकलांच्या इतिहासाविषयी नृत्य-संगीताद्वारे अधिक माहिती मिळाल्यास त्यांच्या मनात या वारशाच्या स्मृती कायम कोरल्या जातील. २९ नोव्हेंबरपासून दोन मालिकांच्या सहा भागांचे सादरीकरण झाले आहे. यानंतरही दर शुक्रवारी, शनिवारी व रविवारी नृत्य-संगीताच्या माध्यमातून सृजनात्मक सादरीकरणाचा आमचा प्रयत्न आहे. ऑक्टोबर ते जानेवारीअखेरपर्यंत शहराच्या पर्यटनाच्या काळात हा उपक्रम राबवला जाईल. या वर्षी हा प्रायोगिक तत्त्वावरचा प्रयत्न असून पुढील वर्षापासून येथील उद्योगजगत, पर्यटन क्षेत्राशी संबंधितांचे सहकार्य मिळाल्यास मोठ्या प्रमाणात केला जाईल."

सामना
संभाजीनगर, शनिवार, दि. १४ डिसेंबर २०१३ शेवटचं पान



औरा नृत्योत्सवात पुणे येथील प्रिया निमकर-जोशी यांच्या शिष्यांनी भरतनाट्यममधून शिवशक्तीचे दर्शन घडविले.

# भरतनाट्यममधून घडले शिवशक्तीचे दर्शन

संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) – आयम नृत्य इन्स्टिट्यूट पुण्याच्या संचालिका प्रिया निमकर-जोशी यांच्या शिष्यांनी आज एमजीएममधील महागामीच्या मंचावर अंगीकम भू नाम यशः या सुमधुर रागातून भरतनाट्यमद्वारे शिवशक्तीचे दर्शन घडविले.

'औरा' नृत्योत्सवाचे आयोजन महागामी गुरूकुल आणि सीआयआयच्या वतीने करण्यात आलेले आहे. यामुळे दर आठवड्याला तीन दिवस शुक्रवार, शनिवार व रविवार या दिवशी शास्त्रीय नृत्यांची पर्वणी संभाजीनगरवासीयांना मिळत आहे. आज सादर केलेल्या भरतनाट्यम प्रकारात त्रिपुरासुराचा भगवान शिवाने केलेला वध पदंलूर शैली व ताल त्रिशूलमध्ये नृत्यांगनांनी सादर केला. नतेश कौटुकम राग हंसादेवी आणि ताल चतुराश्र एकममध्ये शंकराने अंगावर परिधान केलेले वाघाचे वस्त्र, हाती घेतलेले त्रिशूल आणि नंदीवरील सवारी ही चतुराश्रतालामधून प्रस्तुत केली. निलंबरी राग व ताल आदीतून त्रिपुरासुराच्या वधाचे सादरीकरण केले. त्यानंतर कार्यक्रमाचा शेवट राग पारस व ताल आदीद्वारे देवीस्तुतीने केला. यावेळी जर्मनी येथील प्रेक्षकांसह महागामीच्या संचालिका तसेच इतर रसिकजन उपस्थित होते.

दैनिक लोकपत्र
भूमिपुत्रांचा मित्र!
गुडमॉर्निंग औरंगाबाद
सोमवार, दि. २ डिसेंबर, २०१३ ४

# 'अद्भुतम विष्णू मायारूपम्' मोहिनी अट्टम नृत्यातून उलगडले रामायण

**औरंगाबाद, दि.१ / प्रतिनिधी**

अहिल्यामोक्ष, सीता स्वयंवर, शबरीदर्शन हे वर्णम व शिव नवरस रचनेतून महागामीच्या पृथ्वी मंचावर आज थायलंड आणि मलेशिया येथील रसिक प्रेक्षकांना नृत्याची पर्वणी पाहण्यास मिळाली. सुजाता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी मोहिनी अट्टम हे नृत्य सादर केले.

महात्मा गांधी मिशन संचलित महागामी औरा आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय नृत्योत्सवाची सुरुवात शुक्रवार दि.२९ रोजी झाली. दि.१ रविवार रोजी उपासना ॲकडमी मुंबई संचालिका जयश्री नायर यांच्या शिष्या सुजाता नायर व अमृता शिवकुमार यांनी मोहिनी अट्टम नृत्य सादर केले. मल्याळम बोल असलेले वर्णम या रचनेत नृत्याची पेशकश करण्यात आली. वर्णममध्ये अहिल्या मोक्ष, सीता स्वयंवर आणि शबरीचे दर्शन हे रामायणातील अर्विभाव नृत्याच्या माध्यमातून एकाचवेळी टिपण्यात आले. रामायणामध्ये राम वनवासात जाताना अहिल्याला शिळा होऊन पडलेल्या रामाच्या पदस्पर्शाने मोक्ष प्राप्त होतो.

शिव नवरस हे महायोगी भगवान शंकराचे वेळोवेळी बदलले रूप अवतार आणि त्यांचे नटराजाचे नृत्य नवरसातून दाखविण्यात आली. त्यांचे भाव, राग, करुणा हास्य हा प्रत्येक क्षण नृत्याच्या माध्यमातून साकारण्यात आला. त्याला थायलंड व मलेशिया येथील रसिकांनी टाळ्या वाजवून भरभरून दाद दिली. कार्तिक आणि श्रीगणेश या दोन भावांची एकमेकांतील हास्य, विनोद आणि खट्याळ भांडणे हे चेहऱ्यावरील भाव व हातांची रचना ताल, संगत या माध्यमातून साकारली आणि शेवटी भगवान शंकरांची हिमालयातील शांत स्वरूपाची समाधीस्थान शांत्यन रूपात सुजाता नायर व अमृता शिवकुमार यांनी मोहिनी अट्टम नृत्यातून दाखवली.

> आपल्या देशामध्ये भारतीय प्राचीन कला आणि शास्त्रीय नृत्याचे जतन केली जाते. त्यामुळे विदेशी रसिकांना देखील याचा लाभ मिळत आहे. महागामीच्या वतीने या कला जोपासण्याचे काम अविरतपणे चालू आहे. आज थायलंड आणि मलेशिया येथील पर्यटकांना ही सांस्कृतिक धरोहर व अजिंठा वेरूळ येथील परंपरा दाखवू शकलो ही आमच्यासाठी गौरवास्पद बाब आहे.
>
> – पार्वती दत्ता,
> महागामी संचालिका



महागामीच्या पृथ्वी मंचावर मोहिनी अट्टम नृत्य सादर करताना सुजाता नायर, अमृता शिवकुमार तर दुसऱ्या छायाचित्रात भारतीय नृत्याचा आनंद घेताना थायलंड, मलेशिया येथील रसिक प्रेक्षक (छाया–राजेश मुलकेवार)

सोमवार, दि. ६ जानेवारी २०१४ | २
दैनिक लोकपत्र — भूमिपुत्रांचा मित्र!
गुडमॉर्निंग औरंगाबाद

# प्राजक्ता द्रविड आणि तेजस्विनी साठेंची महागामी मंचावर कथ्थकची पर्वणी

**औरंगाबाद, दि. ५ जानेवारी/प्रतिनिधी**

गुरु पंडिता मनिषा साठे यांच्या शिष्या प्राजक्ता द्रविड आणि तेजस्विनी साठे यांनी महागामीच्या वतीने आयोजित नृत्योत्सवामध्ये आज दि.५ जानेवारी रोजी कथ्थक नृत्याचे सादरीकरण केले. तेजस्विनी साठे यांनी अखिल भारतीय गांधी महाविद्यालय व नृत्य अलंकार नृत्य कलेची पदवी पुणे विद्यापीठातून घेतलेली आहे.त्या गेल्या २०वर्षापासून कथ्थक चे प्रशिक्षण घेत आहेत.

त्याचबरोबर प्राजक्ता द्रविड यादेखील मागील २० वर्षापासून कथ्थक सादर करीत आहे.त्या गुरू पंडिता मनिषा साठे यांच्या शिष्या आहे आणि त्यांनी कथ्थक हे मनिषा साठेकडून शिकलेल्या आहेत. त्यांनी आज महागामीच्या मंचावर कथ्थक चे सादरीकरण केले.त्रीदेवी स्तवन, रास ताल,बंदिश मन मोरा, त्यानंतर अष्टापदीने कार्यक्रमाचा शेवट केला. पंडीता मनिषा साठे यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



औरंगाबाद Times of India
शुक्रवार, ३ जानेवारी २०१४ | २

## औरा-औरंगाबाद

'सीआयआय' आणि 'एमजीएम' संस्थेच्या वतीने महागामी परिसरात 'औरा-औरंगाबाद' नृत्यश्रृंखला आयोजित करण्यात आली आहे. शुक्रवार, तीन जानेवारी रोजी मुंबईचे प्रसिद्ध भरतनाट्यम कलाकार पवित्र भट यांचे शिष्य सादरीकरण करणार आहेत. यात शास्त्रीय नृत्याच्या अनेक दुर्मिळ रचना सादर होणार असून रसिकांसाठी हा उत्तम कार्यक्रम आहे.

**शुक्रवार ते रविवार, स्थळ : महागामी, एमजीएम कॅम्पस, वेळ : सायंकाळी सात**



महागामीच्या वतीने संचलिका पार्वती दत्ता यांनी आयोजित केलेल्या 'औरा-औरंगाबाद' या नृत्यमालिकेला रविवारी जबरदस्त यश मिळाले. कलासक्त रसिक, देशी-विदेशी पर्यटक व तारुणाईला समोर ठेऊन शास्त्रीय नृत्य परंपरेची समृद्धता समजावी या उद्देशाने या महोत्सवाला सुरुवार करण्यात आली आहे.

औरंगाबाद | महाराष्ट्र टाइम्स | aur.mtonline.in | औरंगाबाद ■ सोमवार, २ डिसेंबर २०१३ | www.facebook.com/abdmata | २

# पर्यटकांना 'मोहिनीअट्टम'ची मोहिनी

## औरा-औरंगाबादचा उद्देश सफल; नृत्यमालिकेच्या पुढील कार्यक्रमांचा वेध



**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

महात्मा गांधी मिशन संगीत कला अकादमी (महागामी)च्या वतीने संचालिका पार्वती दत्ता यांनी आयोजित केलेल्या 'औरा-औरंगाबाद'या नृत्यमालिकेला रविवारी जबरदस्त यश मिळाले. कलासक्त रसिक, देशी पर्यटक, विदेशी पर्यटक व तरूणाईला समोर ठेऊन शास्त्रीयनृत्य परंपरेची समृद्धता समजावी या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या महोत्सवाला सुरू करण्यात आले होते. रविवारी या सर्व गटातील रसिकांनी उपस्थिती लावली.

औरंगाबाद परिसर, दौलताबाद किल्ला, शिववसंत पासून ते अगदी रामायण व धार्मिक दाखले असलेले विविध पौराणिक कथांचे सादरीकरण मोहिनीअट्टम, कथक यातून तीन दिवसात करण्यात आले. रविवारी ३० पर्यटक मलेशियाहून, १० पर्यटक जपानहून तर तैवानहून ५ पर्यटक शहरात आले होते. या सर्वांनी महागामीतील या कार्यक्रमास उपस्थिती लावली. या सर्व पर्यटकांनी 'फिडबॅक फॉर्म'ही भरून दिले. मोहिनीअट्टममधील विविध प्रकारांचे सादरीकरण, राग, टप्पे व इतर नृत्यशैलीविषयी जाणूनही घेतले. रविवारी रामायणातील विविध प्रसंग आणि भगवान शिवाचे नवरसांच्या सादरीकरणातून सुजाता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी 'मोहिनीअट्टम' मधून मोहिनी घातली. उपसना अॅकॅडमी (मुंबई)तील सुजाता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी रामायणातील विविध प्रसंग, सादर केले. रामाचे सीतास्वयंवरातील 'शिवधनुष्य' तोडणे, इंद्राचे ऐरावतवर येणे, गौतमऋषींचे अहल्या व इंद्राला शाप देणे अहल्याचे मोक्ष, रामाचे अहल्यास पदस्पर्श करणे, शबरीचे फळ चाखणे आदी विविध प्रसंगांचे सादरीकरण मोहिनीअट्टमच्या 'वर्णम्'मधून करण्यात आले. रसिकांना थक्क करण्यात दोघीही यशस्वी ठरल्या. वर्णमनंतर त्या दोघींनी 'नवरस' सादर केला. भगवान शिवाचे नवरस हे सर्वजण जाणतातच. त्यांचे विविध भाव, भावनिक आवर्तन आणि नैसर्गिकता यांचे सादरीकरण 'मोहिनीअट्टम'मधून करण्यात आले. सादरीकरण करताना वीर, हास्य, बिभत्स, रौद्र, अद्भुत, करूण, शांत या रसांचा समावेश होता. 'मोहिनीअट्टम'द्वारे विविध प्रसंगातून या रसपूर्ण भावभावना सादर करताना पौराणिक कथांचा आधार घेण्यात आला. या नृत्यमालिकेच्या यशस्वीतेसाठी सीआयआय, महागामी व टुरिस्ट गाईड्स असोसिएशनने याला उत्कृष्टपणे नियोजन केले.



"औरंगाबादला आलेल्या ३० मलेशियन पर्यटकांना ही नृत्यमालिका पाहण्यासाठी आणले होते. हे पर्यटक नेहमी विविध ऐतिहासिक वास्तू, किल्ले बघतच असतात. महागामीत त्यांना सांस्कृतिक परंपरा बघायला मिळली. आज पर्यटकांना इथे आणण्याचा उद्देश सफल झाला आहे.

**- अमोद बसोले,** गाइड

शास्त्रीय नृत्याची परंपरा मोठी आहे, समृद्ध आहे. कलासक्त रसिकांशिवाय पर्यटक व विदेशी पर्यटकांनाही ही परंपरा समजावी, त्यांना औरंगाबाद परिसरातील नृत्यशैलीही समजावी हा या नृत्यमालिकेचा उद्देश आहे. या मालिकेतील पहिले तीन दिवस झाले आहेत आयोजनाचा उद्देश सफल होत आहे.

**- पार्वती दत्ता,**
संचालिका महागामी



औरंगाबाद | महाराष्ट्र टाइम्स | aur.mtonline.in | औरंगाबाद ■ गुरुवार, १२ डिसेंबर २०१३ | www.facebook.com/abdmata | २

# पर्यटनवृद्धीसाठी 'औरा औरंगाबाद' उपक्रम

## तीन दिवस शास्त्रीय नृत्यातून संस्कृतीचे दर्शन

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद



'औरंगाबाद शहराला सांस्कृतिक परंपरेचा समृद्ध वारसा लाभला आहे. या माध्यमातून पर्यटन व्यवसाय वाढवण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. त्यासाठी 'औरा औरंगाबाद' हा शास्त्रीय नृत्यावर आधारित उपक्रम सुरू करण्यात आला आहे,' अशी माहिती 'सीआयआय'चे अध्यक्ष ऋषी बागला यांनी दिली. एमजीएम संस्थेत बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

औरंगाबाद शहर आणि परिसरात शिल्पकला व चित्रकला यांचा समृद्ध वारसा आहे. मात्र, ही पर्यटनस्थळे पाहिल्यानंतर सायंकाळी पर्यटकांच्या मनोरंजनासाठी सांस्कृतिक कार्यक्रम नाही. या पार्श्वभूमीवर सीआयआय आणि एमजीएम संस्थेने 'औरा औरंगाबाद' हा शास्त्रीय नृत्याचा उपक्रम हाती घेतला आहे. प्रत्येक शुक्रवार, शनिवार व रविवारी सायंकाळी महागामी संस्थेत हा कार्यक्रम होईल. 'इतर शहरांपेक्षा औरंगाबाद सांस्कृतिक वारशांबाबत समृद्ध आहे. बौद्ध, जैन व शैव परंपरा, सुफी आणि संत वाङ्मय विपुल प्रमाणात होते. दक्षिणेतील सांस्कृतिक केंद्र असा शहराचा लौकिक होता. इतर देशात स्थानिक कला पाहण्याची संधी मिळते. या धर्तीवर भारतीय नृत्य परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न 'औरा औरंगाबाद'मधून करणार आहे' असे संचालिका पार्वती दत्ता यांनी सांगितले. पर्यटकांना कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीचे खरे दर्शन घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, पर्यटनवृद्धीसाठी हा उपक्रम व्यापक करण्यावर सीआयआयचा भर आहे. त्यासाठी टूर ऑपरेटर, हॉटेल व्यावसायिक व इतर संस्थांचे सहकार्य घेतले असल्याचे 'सीआयआय'चे उपाध्यक्ष प्रशांत देशपांडे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला एमजीएम संस्थेचे विश्वस्त अंकुशराव कदम, प्रा. रेखा शेळके व अमोल मोहिते उपस्थित होते.

हॅलो औरंगाबाद | शहर विशेष | लोकमत | औरंगाबाद, रविवार, दि. २४ नोव्हेंबर २०१३ | ८

फिरोज खान



महागामीतील कार्यक्रमात लीना मालाकर वीज, पूर्णिमा राय चौधरी व ऱ्हिदेव रे दशावतार सादर करताना.

# कथ्थकचा नृत्याविष्कार

औरंगाबाद : मनमोहक अदाकारी व प्रकाशयोजनेच्या उत्कृष्ट साथीने कथ्थक नृत्याचा कार्यक्रम रंगला. एमजीएमच्या महामामीने शनिवारी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

युवा व नवोदित कलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध होण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

नेपाळच्या लीना मालाकर वीज, पूर्णिमा राय चौधरी, ऱ्हिदेव रे या कलाकारांच्या नृत्याविष्काराचे प्रेक्षकांनी टाळ्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाची सुरुवात शिवस्तुतीने झाली. कलाकारांनी अदाकारी व पदन्यासाने महादेवाच्या अनेक रूपांचे दर्शन करून दिले. जेव्हा जेव्हा नीतिमूल्यांचा ऱ्हास झाला व समाजासमोर संकटे उभी ठाकली त्या-त्या वेळी भगवान विष्णूंनी अवतार घेऊन धर्माची पुन्हा उभारणी केली, असे निवेदन करून 'यदा यदा ही धर्मस्य' या श्लोकाने दशावताराचे प्रसन्न सादरीकरण झाले.

'जय जगदीश हरे' या गीतातून विष्णूच्या दशावताराचे दर्शन घडविण्यात आले. यानंतर कथ्थकचे मुख्य अंग समजला जाणारा झपतालबद्ध व बागेश्री रागातील तराना सादर झाला. डोळ्यांची मोहक हालचाल व हातांची लक्षवेधक अदाकारी यामुळे रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते. यामधील शृंगार, करुण, वीर, हास्य, अद्भुत, रौद्र, भय, बीभत्स आणि शांत या नवरसांचे प्रभावी सादरीकरण झाले.

सर्व कलाकारांच्या हालचालींमध्ये विलक्षण लयबद्धता होती. तरान्यातील जुगलबंदीने प्रेक्षकांचे मन मोहून घेतले व टाळ्यांच्या गजरात वेळोवेळी कलाकारांना दाद मिळाली. नवोदित कलाकारांना महागामीने व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल पूर्णिमा राय चौधरी यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कन्नगी गोसावी हिने केले.

इतर शहरांनपेक्षा औरंगाबाद संस्कृतिक वारशाबाबत समृद्ध आहे. बौद्ध, जैन व शैव परंपरा सुफी आणि संत वाङ्मय विपुल प्रमाणात होते. दक्षिणेतील संस्कृतिक केंद्र असा शहराचा लौकिक होता.

हॅलो औरंगाबाद | शहर विशेष | लोकमत | औरंगाबाद, गुरुवार, दि. १२ डिसेंबर २०१३ | ८

# ऑरा औरंगाबादची तिसरी शृंखला उद्यापासून; २१ जानेवारीपर्यंत चालणार

औरंगाबाद : सीआयआय (कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री) व महागामी यांच्या संयुक्त विद्यमाने 'ऑरा औरंगाबाद'ची तिसरी शृंखला १३ डिसेंबरपासून सुरु होत आहे. औरंगाबादचा ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी व पर्यटनाच्या दृष्टीने पूरक असा हा कार्यक्रम केवळ औरंगाबादमध्ये होत आहे, असे महागामीच्या संचालक पार्वती दत्ता यांनी आज सांगितले. पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

औरंगाबाद सांस्कृतिक, ऐतिहासिकदृष्ट्या समृद्ध असल्यामुळे येथे विदेशी पर्यटकांची ये-जा असते. या पर्यटकांना स्थळांसोबतच तेथील परंपरा, संस्कृती जाणून घ्यायची उत्सुकता असते.

या पर्यटकांसाठी ऑरा औरंगाबाद ही पर्वणी आहे. ऐतिहासिक वास्तूंचा आणि जिवंत कलेचा ठेवा जतन करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरु केल्याचे पार्वती दत्ता म्हणाल्या.

या प्रकारचा कार्यक्रम देशात कुठेही नाही, त्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतील, असा विश्वास आहे. सांस्कृतिक जबाबदारी म्हणून या उपक्रमाला सुरुवात झाली असून, हा उपक्रम कायम राखण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन सीआयआयचे अध्यक्ष ऋषी बागला यांनी यावेळी दिले.

हा पायलट प्रोजेक्ट असून, पुढील वर्षी हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होईल, असा विश्वास सीआयआयचे प्रशांत देशपांडे यांनी व्यक्त केला.

२९ नोव्हेंबर रोजी सुरु झालेला हा कार्यक्रम २१ जानेवारीपर्यंत चालणार आहे. त्यास मिळालेल्या प्रतिसादावर पुढील वर्षीचे नियोजन होईल. कथ्थक, भरतनाट्यम् व ओडिशी नृत्यप्रकार यात सादर होतील. यावेळी बाबूराव कदम व प्राचार्या रेखा शेळके यांची उपस्थिती होती.

हॅलो औरंगाबाद | लोकमत | औरंगाबाद, रविवार, दि. १ डिसेंबर २०१३ | ४ | शहर विशेष

# औरा औरंगाबादमध्ये रंगले मोहिनीअट्टम

औरंगाबाद : १६ व्या शतकात उदयास आलेला केरळमधील मोहिनीअट्टम हा शास्त्रीय नृत्य प्रकार औरा औरंगाबाद या महागामीच्या कार्यक्रमात सादर करण्यात आला. वर्नम व शिवा नवरस यावेळी या नृत्य प्रकारात सादर करण्यात आले.

सीआयआय व महागामीच्या संयुक्त विद्यमाने एमजीएम परिसरात औरा औरंगाबाद हा कार्यक्रम झाला. ३० नोव्हेंबर रोजी दुसऱ्या दिवशी मुंबई येथील फाईन आर्टस् अकादमीच्या नृत्यांगना सुजाता नायर व अमृता शिवकुमार यांनी मोहिनीअट्टम सादर केले. प्रारंभी गणपती, सरस्वती, महालक्ष्मी व महाकाली स्तुतीवर चक्रवाक रागातील व आदिताल असणाऱ्या गीतांवर नृत्य सादर करण्यात आले. नंतर वर्नम हा नृत्य प्रकार सादर झाला. संस्कृत व मल्याळम भाषेचा समावेश असणाऱ्या या प्रकारात रामाच्या स्तुतीपर गीतांचा समावेश होता. त्यानंतर शिवा नवरस हा नृत्य प्रकार सादर झाला. पार्वती- शंकर यामधील शृंगार, अमृत मंथन प्रसंग, गणपती- कार्तिकमधील भांडणाचा आनंद घेणारे शंकर अशा अनेक प्रसंगांवर आधारित गीतांवर यावेळी नृत्य सादर झाले.

मोहिनीअट्टम हा नृत्य प्रकार रसिकांसाठी नावीन्यपूर्ण होता. नृत्यांगनांचा पोशाख व पदन्यास मोहित करणारे होते. महागामीमध्ये प्रवेश करताच स्वागत करण्यासाठी जागोजागी दिवे उजळले होते. धूप, सुवासिक फुले यामुळे प्रसन्न वातावरणात रसिकांनी नृत्याचा आनंद घेतला. (लोकमत ब्युरो)



एमजीएम येथे महागामीच्या कार्यक्रमात मोहिनीअट्टम नृत्य सादर करताना एक कलावंत.

औरंगाबाद | महाराष्ट्र टाइम्स www.maharashtratimes.com | औरंगाबाद ■ शनिवार, २१ डिसेंबर २०१३ | www.facebook.com/abdmata | ३

mtabd@indiatimes.com



# नृत्यातून उलगडले नवरस

'औरा औरंगाबाद'मध्ये अनिता बाबू यांचे नृत्य

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

मानवी जीवनातील नवरसांपैकी पाच रसांचे नृत्यमय दर्शन घडवत ओडिसी नृत्यांगना अनिता बाबू यांनी 'औरा औरंगाबाद' उपक्रमात नवरंग भरले. महागामी संस्थेत झालेल्या या कार्यक्रमात शुक्रवारी अनेक दुर्मिळ रचनांचे सादरीकरण करण्यात आले.

एमजीएम संस्था आणि सीआयआय यांच्या वतीने आयोजित 'औरा-औरंगाबाद' उपक्रमात ओडिसी नृत्यांगणा अनिता बाबू यांनी नृत्यातून मानवी भावभावनांचे रसात्मक चित्र उभे केले. रामायणातील पाच प्रसंग त्यांनी नवरसांपैकी पाच रसांच्या माध्यमातून सहजतेने सादर केले. राम-सीता यांचे लौकिक प्रेम 'श्रृंगार रसातून व्यक्त केले. यात मुद्राभिनयाचा अनिता यांनी खुबीने वापर केला. तर रावणाने केलेले सीतेचे अपहरण 'भयानक' रसातून उत्कटतेने दाखवले. जटायूचा वध 'करुण' रसातून मांडला. राम व रावणातील द्वंद्व विशेष रंगले. प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत आणि पदन्यासातून 'रुद्र' रस अधिक प्रेक्षणीय झाला. या रसातून रावणाचा वध उभारण्यात आला. 'शांतम' रसाने नृत्य सादरीकरणाची सांगता करण्यात आली. उत्तम पदन्यास आणि मुद्राभियनातून पाच रसांवर अनिता यांनी रसिकांना खिळवून ठेवले. गुरु गंगाधर प्रधान यांची मूळ रचना गुरु अरुणा मोहंती यांनी नवीन रुपात आणली आहे. या दुर्मिळ रचनेचा चांगला वापर त्यांनी नृत्य सादरीकरणात केला. त्यानंतर बरखा तन्वीर व उदीता घोष यांनी सावेरी पल्लवी नृत्य रचना सादर केली. तर अनिता बाबू यांच्या महाकाली नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साहित्य संस्कृती

मोहिनीअट्टम हा नृत्य प्रकार रसिकांनसाठी नाविन्यपूर्ण होता. नृत्यांगनांचा पोशाख व पदन्यास मोहित करणारे होते. धूप, सुवासित फुले यामुळे प्रसन्न वातावरणात रसिकांनी नृत्याचा आनंद घेतला.

लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र!

# गुडमॉर्निंग औरंगाबाद

रविवार, दि. २४ नोव्हेंबर २०१३ ४



दिल्ली येथील नृत्य मनन ग्रुपच्यावतीने महागामीमध्ये कथ्थक नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी विविध नृत्याविष्कारांचे सादरीकरण करताना लीना मालकर-विज, पूर्णिमा रॉय चौधरी, हीदेव रे (छाया - राजेश मुलकेवार)

सकाळ औरंगाबाद TODAY औरंगाबाद, शनिवार, ३० नोव्हेंबर २०१३ २



औरंगाबाद : 'औरा औरंगाबाद' कार्यक्रमात ध्रुपद रागावर आधारित शिवा तांडव नृत्य सादर करताना महागामी संगीत गुरुकुल अकादमीच्या विद्यार्थिनी.

## शास्त्रीय नृत्यकलेतून उलगडला औरंगाबादचा इतिहास

### 'महागामी', 'सीआयआय'चा उपक्रम

**औरंगाबाद, ता. २९ :** पर्यटकांना औरंगाबाद जिल्ह्याचा ऐतिहासिक वारसा 'महागामी' संगीत अकादमीच्या विद्यार्थिनींनी भारतीय शास्त्रीय नृत्यातून शुक्रवारी (ता. २९) दाखविला.

महात्मा गांधी मिशनच्या 'महागामी' संगीत अकादमीच्या परिसरात होत असलेल्या 'औरा औरंगाबाद' उपक्रमाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थिनींनी कथक नृत्यातून घृष्णेश्वराचे, बिलावल रागावर आधारित नृत्यातून देवगिरीचे तर ध्रुपद रागावरील शिवा तांडव नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. राज्याची पर्यटन राजधानी म्हणून औरंगाबादची ओळख आहे. जिल्ह्याचे विविध पैलू पर्यटकांना माहीत व्हावेत यासाठी 'महागामी' व 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज'तर्फे 'औरा औरंगाबाद' उपक्रम शहरात प्रथमच होत आहे. याप्रसंगी 'महागामी'च्या संचालिका पार्वती दत्ता म्हणाल्या, की कथक, ओडिसी, भरतनाट्यम, कुचिपुडी शास्त्रीय नृत्यातून ऐतिहासिक वारसा दाखविण्याचा प्रयत्न उपक्रमातून केला जाणार आहे. शहराच्या विकासासोबतच 'सीआयआय'ने महागामी संस्थेच्या सहकार्याने पर्यटन क्षेत्राच्या वृद्धीसाठी पुढाकार घेण्याचे ठरविले आहे. हा उपक्रम औरंगाबादचा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण वारसा दाखविण्यासाठीचे एक व्यासपीठ तयार होणार असल्याचे 'सीआआय'चे अध्यक्ष ऋषीकुमार बागला यांनी सांगितले.

हॅलो औरंगाबाद लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि. ३० नोव्हेंबर २०१३ २



सीआयआय व महागामीच्या संयुक्त विद्यमाने एमजीएम परिसरात शुक्रवारी 'औरा औरंगाबाद' कार्यक्रमात आकर्षक कथ्थक नृत्य सादर झाले.

## कथ्थकमधून उलगडले ऐतिहासिक वारशाचे रहस्य

**औरंगाबाद :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक घृष्णेश्वर, देवगिरी किल्ल्यामध्ये तयार करण्यात आलेला देवगिरी राग, वेरूळ लेण्यांमध्ये कोरलेले रामायण हा ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या औरंगाबादमधील या ऐतिहासिक वारशाची महती कथ्थकद्वारे सांगण्यात आली.

सीआयआय व महागामीच्या संयुक्त विद्यमाने एमजीएम परिसरात 'ऑरा औरंगाबाद' या साखळी संकल्पनेचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाची सुरुवात घृष्णेश्वराच्या स्तुतीने करण्यात आली. महागामीच्या विद्यार्थी कलाकारांनी 'ओम नमः शिवाय' गीत सादर केले. गोपाल नायक यांनी १४ व्या शतकात देवगिरी किल्ल्यामध्ये रचलेला राग 'देवगिरी बिलावल' सादर केला. वेरूळ लेण्यांमध्ये शंकराच्या विविध भावमुद्रा कोरल्या आहेत, त्यामध्ये वसंत ऋतूमध्ये वनामध्ये झालेली शिव-पार्वती भेट 'शिववसंत' अतिशय सुरेखरीत्या कथ्थकद्वारे तांडवरूपात सादर करण्यात आली. लेण्यांमध्ये रामायणाचे काही प्रसंग अतिशय देखण्यारूपात आहेत. त्यापैकी राम वनवास, केवट प्रसंग, पंचवटीतील शूर्पणखा, सीताहरण, अशोकवाटिका, लंकेतील हनुमान, सेतुबंध, राम-रावण युद्ध आणि रामविजय हे प्रसंग सादर झाले. 'निर्झरिणी'ने कार्यक्रमाची सांगता झाली. वेरूळ लेण्यांतील आकर्षक झरे व सीतान्हाणी हिचे मनोगत व्यक्त करणारा हा पदन्यास कार्यक्रमातील लक्षवेधी नृत्य ठरला.

पर्यटनाची राजधानी असणाऱ्या औरंगाबादचे महत्त्व विशद करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे पं. रविशंकर यांच्या सतारीवर सादर झालेला निर्झरिणी हा नृत्य प्रकार. सादरीकरणातील भावमुद्रा, हस्तमुद्रा व ताल यांच्यात कमालीची लय होती. महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी सादर होणाऱ्या नृत्य प्रकारांची वैशिष्ट्ये सांगत सीआयआय व रसिकांचे आभार मानले.


बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक घृष्णेश्वर, देवगिरी किल्ल्यामधे तयार करण्यात आलेला देवगिरी राग, वेरुळ लेण्यांमध्ये कोरलेले रामायण हा ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या औरंगाबादमधील या ऐतिहासिक वारशाची माहिती कथ्थकद्वारा सांगण्यात आली.

दैनिक **लोकपत्र** भूमिपुत्रांचा मित्र!

# गुडमॉर्निंग औरंगाबाद

रविवार, दि. ८ डिसेंबर २०१३ १

# कलिंगा, नर्तना, तिलानाम धून श्रीकृष्णाच्या रासलीला



छाया-राजेश मुलकेवार

**औरंगाबाद,दि.७ डिसेंबर/प्रतिनिधी**

एमजीएमच्या महागामीमध्ये पृथ्वी मंचावर नृत्यगुरू डॉ. सुचेता चाफेकर यांच्या शिष्या अरूंधती पटवर्धन यांनी अर्धनारेश्वर पुष्पांजली, दशावतार, कलिंगा, नर्तना, तिलाना, अभंगा या सर्व मिश्र स्वरूपाच्या राग रचनेतून श्रीकृष्णाच्या विविध लीला नृत्यातून सादर केल्या.

महागामी आणि सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने 'औरा' या नृत्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आज (ता.७) रोजी सादर केलेल्या नृत्यातून अर्धनारेश्वर पुष्पांजली आणि दशावतार रचनांना न्याय देण्यात आला. चेहऱ्यावरील हावभाव व डोळ्यांच्या हालचालींमुळे प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

प्रेम, प्राणी, मोर, राग, पक्षी, व्यक्ती, स्त्री, मुलगा, मुलगी हे नृत्यछटांच्या माध्यमातून कशाप्रकारे व्यक्त होते हे अरूंधती पटवर्धन यांनी सांगितले. गणेश, शिव, विष्णू आदी देवांचे रूप भावमुद्रांतून साकारता येते, असे त्यांनी सांगितले.

दशावतारामध्ये श्रीकृष्णाने केलेल्या रासलीला भावनिक आहे. तसेच वेरूळ येथे लेण्यांमध्ये प्राचीन नृत्य संस्कृती जोपासली गेली आहे. त्यामुळे नृत्याचे विविध पैलू पहावयास मिळतात आणि त्या नृत्याला भारतीय शास्त्रीय संगीताची जोड असल्याने ही संस्कृती समृद्ध आहे असेही पटवर्धन म्हणाल्या. पवित्राय साधून विनाशाय दृश्यकृती यावर नृत्य प्रस्तुत केले. सायली पवार, शालिनी लव्हाळे यांनी नृत्यात साथसंगत केली. महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता आणि थाई येथील विदेशी रसिक, प्रेक्षकांची या नृत्यसंध्येला उपस्थिती होती.

---

दिव्य मराठी

# दिव्य सिटी

## महागामीतर्फे शनिवारी नृत्य नजराणा

**औरंगाबाद** | महागामी गुरुकुलातर्फे २३ नोव्हेंबरला सायंकाळी सात वाजता एमजीएम परिसरातील रुख्मिणी सभागृहात नृत्यसंध्येचे आयोजन करण्यात आले आहे. दिल्ली येथील नृत्य मनन ग्रुपचे कलावंत कथ्थकचे सादरीकरण करतील. शास्त्रीय नृत्य प्रकार अनुभवण्याची संधी नृत्यांगना लीना मालकर-वीज, पूर्णिमा रॉय चौधरी, रिदिव रे यांच्या माध्यमातून उपलब्ध होईल. शिववंदना, दशावतार व तराणा या कथ्थकच्या पारंपरिक नृत्यप्रकारांनी हा अद्भुत सोहळा संस्मरणीय करण्यात येणार आहे. उपस्थित राहावे, असे आवाहन महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी केले आहे.

---

दिव्य मराठी

# दिव्य सिटी

## आजपासून शास्त्रीय नृत्यांची पर्वणी

**औरंगाबाद** | महात्मा गांधी मिशन संचालित महागामी, औरा आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री यांच्या संयुक्त विद्यमाने शहरवासीयांना २९ नोव्हेंबर ते एक डिसेंबरदरम्यान कथ्थक, ओडिसी, भरतनाट्यम, कुचिपुडी आणि मोहिनीअट्टम या शास्त्रीय नृत्यांची पर्वणी अनुभवता येणार आहे. तीन दिवस सायंकाळी ७.३० वाजता हा कार्यक्रम महागामी परिसरात होईल, अशी माहिती महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी दिली. पुणे, चेन्नई, दिल्ली, मुंबई येथील कलावंत नृत्योत्सवात सहभागी होतील.

---

**औरंगाबाद Times** of India गुरुवार, २ जानेवारी २०१४ | २



**▶▶ औरा-औरंगाबाद**

'सीआयआय' आणि 'एमजीएम' संस्थेच्या वतीने महागामी परिसरात 'औरा-औरंगाबाद' नृत्यश्रृंखला आयोजित करण्यात आली आहे. शुक्रवार, तीन जानेवारी रोजी मुंबईचे प्रसिद्ध भरतनाट्यम कलाकार पवित्र भट यांचे शिष्य सादरीकरण करणार आहेत. यात शास्त्रीय नृत्याच्या अनेक दुर्मिळ रचना सादर होणार असून रसिकांसाठी हा उत्तम कार्यक्रम आहे.

**स्थळ : महागामी, एमजीएम कॅम्पस, वेळ : सायंकाळी सात**

---

औरा या नृत्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आज सादर केलेल्या नृत्यातून अर्धनारीनटेश्वर पुष्पांजली आणि दशावतार रचनांना न्याय देण्यात आला. चहऱ्यावरील हावभाव व डोळ्यांच्या हालचालीमुळे प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

---

**दैनिक भास्कर** www.bhaskarhindi.com औरंगाबाद, शुक्रवार 29 नवंबर, 2013 | 20

# औरा-औरंगाबाद नृत्य महोत्सव आज से





**संवाददाता** | औरंगाबाद

शहर के एमजीएम कैम्पस में स्थित महागामी की ओर से नृत्य समारोह औरा-औरंगाबाद का आयोजन किया गया है। 29 नवंबर से शुरू हो रहा यह कार्यक्रम 5 जनवरी 2014 तक चलेगा। इस बीच प्रत्येक शुक्रवार से रविवार शाम को 7.30 से 8.30 बजे इंडियन क्लासिकल नृत्य कला में कत्थक, ओडिसी, भरतनाट्यम, मोहिनी अट्टम, कुचपुड़ी आदि नृत्यकला पेश किए जाएंगे। कार्यक्रम शहर की ऐतिहासिक विरासत को एक स्थान पर लाने की कोशिश कर उसे बेहतर स्टेज देने हेतु रखा गया है, यह जानकारी महागामी की संचालिका पार्वती दत्ता ने प्रेस विज्ञप्ति द्वारा दी।

कार्यक्रम में मुंबई की सुजाता नायर ग्रुप मोहिनीअट्टम पेश करेंगी। इसके साथ ही पुणे की डॉ. सुजाता चाफेकर ग्रुप, चेन्नई के आनंद सच्चिदानंद और मुंबई की डॉ संध्या पुरचई ग्रुप की ओर से भरतनाट्यम नृत्यकला, तो अनीता बाबू ग्रुप, झेलम परांजपे ग्रुप और दक्षरूप मशरूवाला ग्रुप ओडिसी नृत्य प्रस्तुत करेंगे। इसके अलावा अगले तीन सप्ताह में कई कलाकार अपनी कला की प्रस्तुति देंगे। शहर के कला प्रेमी, सैलानियों के साथ-साथ सभी से कार्यक्रम का लाभ लेने का आह्वान किया गया है।

---

**दैनिक भास्कर** औरंगाबाद, शुक्रवार 22 नवंबर, 2013 | 15

# कत्थक नृत्य कार्यक्रम कल

**औरंगाबाद** | महात्मा गांधी मिशन संगीत अकादमी औरंगाबाद (महागामी) की ओर से शनिवार 23 नवंबर की शाम 7 बजे महागामी के ओपन थिएटर में दिल्ली के नृत्य मनन ग्रुप की ओर से कत्थक कार्यक्रम का आयोजन किया गया है। इस कार्यक्रम में लीना मलाकर विज, पूर्णिमा रॉय चौधरी और हृदय रॉय कत्थक नृत्य पेश करेंगे। यह कार्यक्रम नागरिकों के लिए मुफ्त रखा गया है।

सिटी कनेक्ट
शनिवार, ३० नोव्हेंबर २०१३
औरंगाबाद.
दिव्य सिटी .७

# पहिल्या दिवशी राग 'देवगिरी बिलावल'ची सलामी

## महागामी अकादमीच्या नृत्योत्सवाला प्रारंभ

प्रतिनिधी | औरंगाबाद

कथ्थक नृत्याच्या कलात्मक अभिव्यक्तींनी परिपूर्ण 'भाग्यविधाता तख्तन के दाता' या राग देवगिरी बिलावलच्या अद्वितीय रचनेने महागामीच्या कलावंतांनी नृत्योत्सवाच्या पहिल्याच दिवशी रसिकांना पर्वणी दिली. 'शिव वसंत' रचनेतून वेरूळच्या शिल्पांतील शिवरूपांबरोबर 'रामायण' रचनेतून रामायणाचे विविध प्रसंग कलांवतांनी सादर केले.

महात्मा गांधी मिशन संचालित महागामी, औरा आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीनदिवसीय नृत्योत्सवाची सुरुवात शुक्रवारी(२९ नोव्हेंबर) झाली. पृथ्वी मंचावर ज्योतिर्लिंगांवर आधारित पखवाज रचनेने कलावंतांनी नृत्याला सुरुवात केली.

पखवाजच्या तालामधील पदविन्यासाने विविध ज्योतिर्लिंगांचा बोध करविला. यानंतर १४ व्या शतकात देवगिरीत वास्तव्य केलेले गोपाल नायक यांनी रचलेल्या राग 'देवगिरी बिलावल' नृत्यांगणांनी सादर केला. लोप पावणाऱ्या रचनेचे वैशिष्ट्य म्हणजे मूर्त आणि अमूर्त रचनाचे सादरीकरण एकानंतर एक केले जायचे. महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी यात संशोधन करून नव्याने रचनेची निर्मिती केली आहे. विलंबित तीन तालातील रचनेवर नृत्य केले. राग वसंतमधील 'शिव वसंत' या रचनेतून वेरूळच्या शिल्पांतील शिवरूपे सादर करण्यात आली. 'देखो बन बन्यो आज उमाकांत, मानो देखन आई ऋतू बसंत' ही रचना बालशिव, तारुण्यातील शिव, शिवविवाह आणि तांडव अशी विविध रूपे दाखवली. 'रामायण' या रचनेतून रामयणातील सर्व प्रसंग कलावंतांनी सादर केले.


'देवगिरी बिलावल' रचनेवर कथ्थक नृत्य सादर करताना कलावंत. छाया : अरुण तळेकर

वेरूळ शिल्पातील 'सीतान्हाणी' येथे येणाऱ्या पाण्याचा आवाज, पक्षांचा चिवचिवाट आणि निसर्गाचा मिलाफ 'निर्झरिणी' रचनेतून दाखविण्यात आला. शीतल भामरे, राधिका शेलार, कन्नगी गोसावी, सृष्टी जुन्नरकर, प्रिया दीक्षित, जिजाऊ कोलते, प्रीती विखणकर, गायत्री खंडागळे, रसिका तळेकर, स्नेहल काथारे यांनी नृत्यगुरू पार्वती दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली सादरीकरण केले. १ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या नृत्योत्सवात विविध नृत्यप्रकारांचे सौंदर्य अनुभवता येणार आहेत. सायंकाळी ७.३० वाजता महागामीच्या पृथ्वी मंचावर हे कार्यक्रम होतील.

भगवान शिवाचे नवरस हे सर्वजण जाणतातच. त्यांचे विविध भाव, भावनिक आवर्तन आणि नैसर्गिकता यांचे सादरीकरण 'मोहिनीअट्टम' मधून करण्यात आले.

गुडमॉर्निंग औरंगाबाद
दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र!
शनिवार, दि. २३ नोव्हेंबर २०१३ १



# महागामीच्या वतीने आज कथ्थक संध्या

**औरंगाबाद, दि.२२ / प्रतिनिधी** – महात्मा गांधी मिशन संस्थेच्या महागामीच्या वतीने दि.२३ नोव्हेंबर रोजी कथ्थक संध्येचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दिल्लीच्या नृत्य मनन ग्रुपचे लिना वीज, पुर्णिमा रॉय चौधरी, ह्रीदेव रे हे कथ्थक सादर करणार आहेत. एमजीएमच्या रुक्मिणी सभागृहात नृत्यसंध्येचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून शिववंदना, दशावतार आणि तराणा हे कलाप्रकार कथ्थकच्या माध्यमातून म न्यिवर सादर करतील. लीना वीज या जयपूर घराण्याच्या नृत्यांगणा असून त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. कथ्थक नावाच्या संस्थेद्वारे त्या शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण आणि प्रसाराचे काम करतात. पुर्णिमा रॉय चौधरी या जयपूर घराण्याच्या नृत्यांगणा आहेत. लोकनृत्य, क्रिएटीव डान्स, छाऊ नृत्य प्रकारात त्यांनी प्रावीण्य मिळविले आहे. बॅलेच्या माध्यमातून त्यांनी राधा, द्रोपदी, सीता अशा पौराणिक नायिका सादर केल्या आहेत. ह्रीदेव रे यांनी गुरूनंदिनी सिंग यांच्याकडे कथ्थकचे प्रशिक्षण घेतले आहे.- तरुण कलाकारांमध्ये त्यांचा समावेश होतो.



औरंगाबाद
महाराष्ट्र टाइम्स www.maharashtratimes.com
औरंगाबाद ■ रविवार, १ डिसेंबर २०१३
www.facebook.com/abdmata
५

# 'वर्णम' अन् 'नवरसां'मधून रसिक थक्क

## महागामीत 'औरा-औरंगाबाद'चा दुसरा दिवस गाजला 'मोहिनीअट्टम'

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**



रामायणातील विविध प्रसंग आणि भगवान शिवाचे नवरसांच्या सादरीकरणातून सुजाता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी 'मोहिनीअट्टम' मधून मोहिनी घातली, निमित्त होते महागामीतील 'औरा-औरंगाबाद' या नृत्यमालिकेच्या दुसऱ्या दिवसाचे.

उपसना अॅकॅडमी (मुंबई)तील सुजाता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी रामायणातील विविध प्रसंग,सादर केले. रामाचे सीतास्वयंवरातील 'शिवधनुष्य' तोडणे, इंद्राचे ऐरावतवर येणे, गौतमऋषींचे अहल्या व इंद्राला शाप देणे अहल्याचे मोक्ष, रामाचे अहल्यास पदस्पर्श करणे, शबरीचे फळं खाणे आदी विविध प्रसंगांचे सादरीकरण मोहिनीअट्टमच्या 'वर्णम्'मधून करण्यात आले. रसिकांना थक्क करण्यात दोघीही यशस्वी ठरल्या. वर्णम नंतर त्या दोघींनी 'नवरस' सादर केला.

भगवान शिवाचे नवरस हे सर्वजण जाणतातच. त्यांचे विविध भाव, भावनिक आवर्तन आणि नैसर्गिकता यांचे सादरीकरण 'मोहिनीअ्टट्म'मधून करण्यात आले. सादरीकरण करताना वीर रस, हास्य रस, बिभत्स रस, रौद्र रस, अदभुत रस, करूण रस, शांत रस या रसांचा समावेश होता. 'मोहिनीअट्टम'द्वारे विविध प्रसंगातून सादर करण्यात आलेल्या या रसांना सादर करताना पौराणिक कथांचा आधार घेण्यात आला. सुता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी आत्मदाह, बिभत्सता, शांतता, करूणा, राग, हास्य यांचे भाव दाखवून रसिकांना थक्क केले. शनिवारी सादर करण्यात आलेल्या या 'वर्णम' व 'नवरस' याचे दिग्दर्शन ज्येष्ठ नृत्यांगना जयश्री नायर यांचे होते सादरीकरण करणाऱ्या सुजाता नायर या त्यांच्याच कन्या आहेत. यावेळी कलासक्त रसिक, उद्योजक, व सीआयआयचे पदाधिकारी व महागामीच्या पार्वती दत्ता यांची उपस्थिती होती.

सिटी वुमेन रविवार, २२ डिसेंबर २०१३ औरंगाबाद. दिव्य सिटी .४

कथ्थक | अपूर्वा वाडके-बक्ष यांनी प्रकट केली विविध आठ रूपे

# भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील अष्टनायिकांचे आकर्षण

प्रतिनिधी | औरंगाबाद



नृत्यशृंखलेत अष्टनायिकांचे सादरीकरण करताना कथ्थक नृत्यांगना अपूर्वा वाकडे-बक्ष.

महागामीच्या 'औरा औरंगाबाद' नृत्यशृंखलेत शनिवारी (२२ डिसेंबर) कथ्थक नृत्यांगना अपूर्वा वाकडे-बक्ष यांनी भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील अष्टनायिकांचे सादरीकरण करून रसिकांना आकर्षित केले. ठुमरीच्या माध्यमातून त्यांनी अष्टनायिका साकारल्या. नायिका आणि नायकांच्या नात्यांतील आठ विविध रूपे प्रकट केली.

'कथ्थकानुभूती' या पारंपरिक रचनेने अपूर्वा यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. शिवशंकराच्या शक्तीचे दर्शन घडवणारी ही रचना होती. शंकराचा भक्त रावणाने ही रचना केली होती. शंकराने दिलेल्या शक्तीचा वापर करून रावण कैलास पर्वताला हलवण्यास निघतो. त्या वेळी रावणाने म्हटलेल्या तांडव स्तोत्रात शंकराच्या हातातील त्रिशूळ, डोक्यावर गंगा, गळ्यात सर्प याचे विस्तृत वर्णने केले आहे. अद्‌भुत नृत्याविष्काराची ही रचना अमृता केतकर, शिवानी कोप्पीकर, जान्हवी कापरेकर आणि सायली वाघ यांनी सादर केली. बागेश्री रागात बांधलेल्या 'ठुमरी'मधून अष्टनायिकेतील दोन नायिकांचे रूप प्रकट करण्यात आले. प्रोशिपतिकाला सोडून गेलेला पती अद्यापही परतला नसल्याने त्यांच्यातील विरह नायिकेने सादर केला. दुसरी नायिका राधा आहे. यात क्षणभरही श्रीकृष्णाशिवाय न राहू शकणारी राधा त्याच्याशिवाय कशी राहू शकते, असे आश्चर्य भाव तिच्या चेहऱ्यावर होते. कृष्णावर दैवी प्रेम करणारी राधा त्याचेच रूप सर्वत्र पाहत आहे. नृत्याच्या माध्यमातून नाट्य, अभिनयाने सौंदर्य नृत्यांगनेने उलगडून दाखवले.

कथ्थक पारंपरिक रचना 'ताल पंचमेश्वरी' ही संथ आणि नाजूक हालचालींनी सुरू होणारी रचना शेवटाकडे जाताना अतिशय जलदगतीने संपली. चपळाईने होणाऱ्या वेगवान नृत्यछटा रसिकांच्या हृदयाचा वेध घेणाऱ्या होत्या. परण, चक्र, थाट, तिहाई आणि उत्थान या शैलीने हे नृत्य सादर केले. यानंतर 'तराणा' या अमृत बोल असलेल्या रचनेतून तोडा आणि तिहाई सादर करण्यात आली. एक ताल आणि 'मियां की तोडी' या रागातील रचना होती. 'द्रुत तीन तालाच्या रचनेने शेवट झाला. तत्कार असलेली ही रचना नृत्यातील ताल आणि ठेका धरायला लावणारी होती. महागामीच्या माध्यमातून शहरात येणाऱ्या पर्यटकांना शास्त्रीय नृत्याची अलौकिक, विलोभनीय पर्वणी उपलब्ध करून देणे आणि रसिकांमध्ये नृत्याविषयी जनजागरण करणे असा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांनी स्पष्ट केले.




महागामी

# शंकराची सात तांडव रूपे साकारली नृत्य पाढ्यामधून

औरंगाबाद, दि.२९ डिसेंबर/प्रतिनिधी –

एमजीएम महागामी येथे सुरू असलेल्या औरा-औरंगाबाद नृत्योत्सवात आज ता. २९ रोजी द्यावापृथ्वी मंचावर गणेश स्तुतीने भरतनाट्यम् नृत्याला सुरुवात झाली. मागील दोन दिवसांपासून गणेश कौतुक, विष्णू कौतुक आणि तांडव रूपातील भगवान शंकराची विविध रूपे नृत्यातून साकारण्यात आली. मुंबई येथील डॉ. संध्या पुरेच्या आणि सरफोजीराजे भोसले सेंटर, भरत कॉलेज ऑफ फाईन आर्ट कल्चरच्या आठ नृत्य कलाकारांनी आपल्या कौशल्यपूर्ण नृत्याची पर्वणी औरंगाबादवासियांना दिली. गणेशस्तुतीनंतर गणेश कौतुकमध्ये लंबोधर, मोठे कान आणि वाहन मुशक अशी मूर्तस्वरूप रूपं नृत्यातून साकारली. राग नताईमध्ये ताल आदीताल, चतुरास्त्र एक मध्ये हे गणेश कौतुक सादर करण्यात आले.

शिवपार्वती, दर्पणसुंदरी, कृष्णा आणि गोपिका असा संगम असलेले नृत्य राग खामज व ताल चतुरास्त्र रूपकमध्ये झाले. देवी माँ लक्ष्मीचे आदीशक्ती रूपेही महालक्ष्मी आष्टक राग मल्लीका व तालमिश्र चापूमध्ये कलाकारांनी सादर केले. कार्यक्रमाचा शेवट नृत्यपाढ्याने करण्यात आला. त्यामध्ये शंकराचे सप्त तांडव मांडण्यात आले होते. ताल रेवती व ताल आदीमध्ये चित्रा देवी, मंदिरा जोशी, दिशा वाघेला, पुष्कर देवचाके, राधिका पाटकर, शांती मोहंती, सुहानी धनके, सुरभी पारकर यांनी सादर केले.

दैनिक लोकपत्र भूमिपुत्रांचा मित्र! गुडमॉर्निंग औरंगाबाद
सोमवार, दि. ९ डिसेंबर २०१३ १

# अबीर गुलाल उधळीत रंग...

## संत चोखोबांच्या अभंगावर भरतनाट्यम्



औरंगाबाद /प्रतिनिधी – संत चोखोबाच्या अभंगावर व राग मल्लीका ताल एकतालम वर गुरू डॉ.जयश्री राजगोपालन यांच्या शिष्या सविता आणि नागराज यांनी भरतनाट्यम् नृत्य केले. सविता या नृत्यशैली भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेत आहे. तर नागराज यांनी भरतनाटयम्मधून एम .ए केले आहे. त्यांनी सादर केलेले नृत्य भरतनाट्यम् चे अनोखे दर्शन घडविणारे होते. औरा औरंगाबाद या उपक्रमांतर्गत महागामीच्या द्यावपृथ्वी मंचावर आज दि ८ डिसेंबर रोजी भरतनाट्यम् ची प्रस्तुती करण्यात आली. पूरंदर दास यांची कृती असलेल्या नामसंकीर्तनातून राम आणि वानर यांचा अनोखा संवाद दाखविला गेला. त्यानंतर वारकरी संप्रदायाची ओळख सांगणारे संत तुकाराम आणि संत चोखामेळा, यांच्या अभंगावर नागराज व सविता यांनी रसिकांना नृत्य आविष्कार घडवला. ताल एकतालात भडवे मज मारीती काय केला अपराध विनविती, चोखा ही भावस्पर्शी विठोबास साद घालणारे अभंगावरती नागराज यांनी नृत्य केले. नाचत आले गणपती, हा संत तुकाराम लिखित अभंग मिश्र वृंदावनी रागात तसेच ताल आदी तालम.. व राग भुपाळीमधील सुंदर ते ध्यान उभे विटेवरी कर कटेवरी ठेवूनिया या सुमधूर, कर्णप्रिय अभंगांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन अनिता दंडगवाळ यांनी केले.

महागामीच्या 'औरा-औरंगाबाद' नृत्यशृंखलेत शनिवारी कथ्थक नृत्यांगना अपूर्वा वाकडे-बक्ष यांनी भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील अष्टनायिकांचे सादरीकरण करुन रसिकांना आकर्षित केले.

शनिवार-रविवार हे दोन दिवस अनेकवेळा शहरवासियांसाठी संगीत, साहित्य व सांस्कृतिक कार्यक्रमांनी फुलून जातात. 'एमजीएम'च्या निसर्गरम्य वातावरणात साजरा झालेल्या या कार्यक्रमाला रसिकांची नेहमीप्रमणे गर्दी झाली होती.

सिटी ॲक्टिव्हिटी | रविवार. १ डिसेंबर २०१३ औरंगाबाद. | दिव्य सिटी .२

'औरा' नृत्योत्सव | अमृता शिवकुमार आणि सुजाता नायर-संजय यांचे सादरीकरण

# नवरसांतून शिवरूपाचे दर्शन

प्रतिनिधी | औरंगाबाद

गणेशवंदना, रामायणातील रंजक कथा आणि नवरसांतील शिवरूपाचे अद्‌भुत दर्शन घडवत 'औरा' नृत्योत्सवाचा दुसरा दिवस मोहिनीअट्टम नृत्यांगना अमृता शिवकुमार आणि सुजाता नायर-संजय यांनी संस्मरणीय केला.

महागामीच्या 'द्यावापृथ्वी' मंचावर शनिवारी (३० नोव्हेंबर) सायंकाळी ७ वाजता 'जेम जेम किट्ट तक'च्या बोलांवर आधारलेल्या गणेश आणि माता मुकांबिका वंदन करण्यात आले. चक्रवागम रागामध्ये आदितालात रचलेल्या रचनेने कर्णमधुर संगीतासह अदाकारीही सादर करण्यात आली. 'वर्णम' नृत्यप्रकारात रामायणातील विविध प्रसंग उभे केले. अहिल्या मोक्ष, सीता स्वयंवर आणि शबरी भेट या प्रसंगात रामचंद्राची विविध रूपे दाखवण्यात आली.

**शिवरूपांच्या नवरसांचे नादमाधुर्य :** 'शृंगारम गिरी सुता' नवरसांत नटलेली रचना शनिवारी संध्येचे आकर्षण ठरली. हास्य, रौद्र, बीभत्स, वीर, भय, कारुण्य, शांत, शृंगार आणि अद्‌भुत रसांचा नृत्याविष्कार रंगला. प्रत्येक रसासाठी निवडलेल्या रागातून हावभाव प्रकट होत होता. बिहाग, केदार गवळाई, भैरवी, आठना, हिंदोलम, सावेरी, रेवती, आनंद भैरवी आणि वलची आदी रागमालेला कर्नाटकी संगीताची जोड आणि त्यावर सादर होणारी नृत्य अदाकारी उल्लेखनीय होती. या वेळी नृत्यगुरू आणि महागामी संचालिका पार्वती दत्ता यांची उपस्थिती होती.



मोहिनीअट्टममध्ये नवरस सादर करताना अमृता शिवकुमार आणि सुजाता नायर-संजय. छाया : रवी खंडाळकर

## कलाप्रकारांची उपासकांना अनुभूती देणार



भारतातील विविध शास्त्रीय नृत्यप्रकार कलाउपासक आणि रसिकांना अनुभवण्यास देणे हा उपक्रमामागील उद्देश होता. पुढील तीन महिने 'औरा' उपक्रम शृंखलेतून ज्ञानात भर टाकून कलासमृद्ध करण्याचे काम करण्यात येणार आहे.

**पार्वती दत्ता,** संचालिका, महागामी गुरुकुल.

## मोहिनीअट्टमचा आज नजराणा

रविवारी (१ डिसेंबर) सायंकाळी ७:३० वाजता मोहिनीअट्टम नृत्यप्रकाराच्या काही अनोख्या कलाकृती कलावंत सादर करणार आहेत. रसिकांना यामध्ये शास्त्रीय नृत्यांचा आस्वाद येईल.

रविवार महाराष्ट्र टाइम्स



५

औरंगाबाद, २४ नोव्हेंबर २०१३ ◆ पाने १६ (संवादसह) ◆ शहर आवृत्ती ◆ रुपये ३.००

# औरंगाबादेत संगीतमय शनिवार

## शहरात बहारदार कार्यक्रमांची मेजवानी

**उन्मेष देशपांडे, औरंगाबाद**

शनिवारची सायंकाळ, गुलाबी थंडी थोडी कमी झालेली अशा वातावरणात औरंगाबादकरांनी संगीतमय शनिवार अनुभव घेतला. चार बहारदार कार्यक्रमांच्या वेळा मात्र जवळपासच्या असल्याने रसिकांची चांगलीच धावपळ झाली.

एरव्ही सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी औरंगाबादकर सोडत नाहीत. बऱ्याच कालखंडानंतर चार कार्यक्रम शनिवार व रविवारी आयोजित करण्यात आले आहेत. शनिवार - रविवार हे दोन दिवस अनेकवेळा शहरवासीयांसाठी संगीत, साहित्य व सांस्कृतिक कार्यक्रमांनी फुलून जातात. त्याचा अनुभव आज रसिकांना आला. 'महागामी' तर्फे कथ्थकावर 'नृत्यसंध्या' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'एमजीएम'च्या निसर्गरम्य वातावरणात साजरा झालेल्या या कार्यक्रमाला रसिकांची नेहमीप्रमाणे गर्दी झाली होती. गरवारे कम्युनिटी सेंटरमध्ये पंडित बहिरगावकर स्मृती संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवासाठीही रसिक मोठ्या संख्येने आले होते.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पंडित जितेंद्र अभिषेकी स्मृती महोत्सवातही मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचेही रसिकांना आकर्षण होते. दोन दिवस हा संगीत महोत्सव चालणार आहे. उद्या रविवारी पंडित शौनक अभिषेकी यांच्या मैफलीची मेजवानी रसिकांना मिळणार आहे.

शहानूरवाडीत भरतनाट्यमच्या सादरीकरणाचा कार्यक्रम होता. शास्त्रीय नृत्याची आवड असणारे रसिक या कार्यक्रमाकडे वळले. चारही कार्यक्रम बहारदार असल्याने एक कार्यक्रमाला हजेरी लावून उर्वरित कार्यक्रमांचा आनंद घेता नसल्याची नाराजी अनेकांच्या चेहऱ्यावर दिसून आली.

संबंधित वृत्त ■ २



सामना
संभाजीनगर, गुरुवार, दि. १२ डिसेंबर २०१३ शेवटचं पान

# पर्यटनवृद्धीसाठी 'औरा संभाजीनगर'

संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी)– शहराला सांस्कृतिक परंपरेचा समृद्ध वारसा लाभला आहे. या माध्यमातून पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. त्यासाठी 'औरा संभाजीनगर' हा शास्त्रीय नृत्यावर आधारित उपक्रम सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती सीआयआयचे अध्यक्ष ऋषी बागला यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संभाजीनगर शहर आणि परिसरात शिल्पकला व चित्रकला यांचा समृद्ध वारसा आहे. मात्र, ही पर्यटनस्थळे पाहिल्यानंतर सायंकाळी पर्यटकांच्या मनोरंजनासाठी सांस्कृतिक कार्यक्रम नाही. या पार्श्वभूमीवर सीआयआय आणि एमजीएम संस्थेने 'औरा संभाजीनगर' हा शास्त्रीय नृत्याचा उपक्रम हाती घेतला आहे. प्रत्येक शुक्रवार, शनिवार व रविवारी सायंकाळी महागामी संस्थेत हा कार्यक्रम होईल. इतर शहरांपेक्षा संभाजीनगर सांस्कृतिक वारशाबाबत समृद्ध आहे. बौद्ध, जैन व शैव परंपरा, सुफी आणि संत वाङ्मय विपुल प्रमाणात होते. दक्षिणेतील सांस्कृतिक केंद्र असा शहराचा लौकिक होता. इतर देशांत स्थानिक कला पाहण्याची संधी मिळते. या धर्तीवर आपल्या नृत्य परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न 'औरा-संभाजीनगर' मधून करणार आहे, असे संचालिका पार्वती दत्ता यांनी सांगितले.

दरम्यान, पर्यटनवृद्धीसाठी हा उपक्रम व्यापक करण्यावर सीआयआयचा भर आहे. त्यासाठी टूर ऑपरेटर, हॉटेल व्यावसायिक व इतर संस्थांचे सहकार्य घेतले असल्याचे सीआयआयचे उपाध्यक्ष प्रशांत देशपांडे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला एमजीएम संस्थेचे विश्वस्त अंकुशराव कदम, प्रा. रेखा शेळके व अमोल मोहिते उपस्थित होते.

एकाहून एक सरस अशा नृत्यांची अदाकारी नृत्यांगना सुजाता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी एमजीएमच्या महागामीत आयोजित कार्यक्रमात सादर केले. त्यांची अदाकारी लक्षणीय ठरली.

पुण्यनगरी औरंगाबाद
वृत्तवेध औरंगाबाद रविवार,१ डिसेंबर २०१३ ३

## 'वर्णम्' शास्त्रीय नृत्यांनी रसिकांना 'मोहिनी'



औरंगाबाद/प्रतिनिधी

वर्णम् या शास्त्रीय नृत्यात मोहिनीअट्टम्द्वारे मणिपरवलम् यातील मिश्रित मल्याळम् संस्कृती. यातील संगीताच्या माध्यमातून रामाचे गुणगाण करण्याची शैली नृत्याच्या माध्यमातून प्रगट करून दाखविली. एकाहून एक सरस अशा नृत्यांची अदाकारी नृत्यांगना सुजाता नायर आणि अमृता शिवकुमार यांनी एमजीएमच्या महागामीत आयोजित कार्यक्रमात सादर केले. त्यांची अदाकारी लक्षणीय ठरली. महागामी गुरुकुलतर्फे कन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजच्या (सीआयआय) सहकार्याने औरंगाबाद शहरातील नृत्याची झलक दाखविणारा औरा-औरंगाबाद या शास्त्रीय नृत्याचे महागामी गुरुकुल, एमजीएम येथे सुरू आहे. शिव नवरसा यात शिव हे महायोगी रूप धारण करून आपल्या नटराज असल्याने चांगल्या नृत्य आणि ॲक्टिंगचे सर्वश्रेष्ठ असून त्यांनी केलेल्या कलाकारीस तोड नाही. हेच शिव नवरसाच्या माध्यमातून शिव अर्धांगिनी पार्वती यांची स्फूर्ती घेऊन सादर करण्यात आले. शिवासह गणेश आणि कार्तिक यांच्यातील 'हास्य रस' दर्शविणारे नृत्यही सादर करण्यात आले. त्याचप्रमाणे सती आणि अहिल्या तसेच शबरी आणि गौतम यांच्या बाबतची माहिती देऊन शबरीने श्रीरामास उष्टी बोरं दिल्याचे नृत्याद्वारे सांगण्यात आले. दर शुक्रवार, शनिवार आणि रविवार असे तिन्ही दिवस महागामीतर्फे या शास्त्रीय संगीताची मेजवानी अनुभवायास मिळणार असल्याची माहिती महागामीच्या पार्वती दत्ता यांनी दिली.

सिटी वुमेन रविवार, १५ डिसेंबर २०१३ औरंगाबाद. दिव्य सिटी .४

नृत्योत्सव | मुंबईच्या अंकुर बल्लाळ ग्रुपने केली पारंपरिक रचनांची प्रस्तुती

## ओडिसी नृत्याविष्कारातून कृष्णलीलांचे सादरीकरण

प्रतिनिधी | औरंगाबाद

'औरा' औरंगाबाद आणि महागामीच्या अंतर्गत सुरू असलेल्या नृत्य जागरण कार्यक्रमांतर्गत शनिवारी (१४ डिसेंबर) गुरू केलूचरण महापात्रा यांच्या महान रचनांची प्रस्तुती करण्यात आली. ओडिसी नृत्याप्रकारातून कृष्णलिलांचे सादरीकरण मुंबईच्या अंकुर बल्लाळ यांच्या ग्रुपने केले. दीपाली टिकमने 'धीर समीरे यमुना तीरे' रचनेचे सोलो स्टाइलमध्ये केलेले सादरीकरण विलोभनीय ठरले.

शिवस्तुतीने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. 'विश्वेश्वरा महादेवाय' या पारंपरिक रागात बांधलेल्या एकताली अभिनय नृत्यपदाने शिवशंकराला नमन करण्यात आले. गुरू झेलम परांजपे यांनी रचलेल्या 'कलावती पल्लवी' या शुद्ध नृत्यप्रकाराने रसिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. हळूहळू सुरू होत रचनेने वेग धरला. कलावती रागातील या रचनेला आदितालात बांधण्यात आले. यानंतर पद्मविभूषण गुरू केलूचरण महापात्रा यांची 'धीर समीरे यमुना तिरे' ही रचना प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. या अभिनय पदातून कलावंतांचे नृत्यकौशल्य पणाला लागले होते. यमन रागात आणि एकतालामध्ये ही बंदिश निबद्ध होती. 'हरि रिह मुग्ध' ही ओरिया अभिनय पदाची रचनादेखील महापात्रा यांचीच होती. यामध्ये कृष्णाच्या येण्याने आनंदित झालेल्या गोपिका नृत्याचा फेर धरत गाणी गातात हे दृश्य दाखवण्यात आले. 'मोक्ष' या रचनेने सांगता झाली. स्मितालयाचे अंकुर बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली रूपाली कदम, दीपाली टिकम, सनातन चक्रवर्ती यांनी अद्वितीय नृत्यपर्वणी रसिकांना दिली.



नृत्य सादर करताना मुंबईच्या अंकुर बल्लाळ यांच्या ग्रुपचे कलावंत. छाया : माजेद खान

सिटी वुमेन | शनिवार, २१ डिसेंबर २०१३ | औरंगाबाद. | दिव्य सिटी .४

**पर्वणी** | महागामी नृत्योत्सवात भुवनेश्वरच्या अनिता बाबूंची नवरसयुक्त सादरीकरण

# ओडिसी नृत्यातून रामायण साकारले

प्रतिनिधी | औरंगाबाद

महागामी आणि औरा औरंगाबाद नृत्योत्सवाच्या तिसऱ्या शृंखलेत शुक्रवारी (२० डिसेंबर) भुवनेश्वरच्या नृत्यांगना अनिता बाबू यांनी प्रस्तुती सादर केली. शृंगार रसातून राम-सीतेचे प्रेम आणि रौद्र रसातून युद्धभूमीवरील राम आणि रावणाचे द्वंद्व ओडिसी नृत्यातून सादर करण्यात आले.

'रस' या प्रस्तुतीने अनिता बाबू यांनी नृत्य सादरीकरणाला सुरुवात केली. राम-सीता यांच्यातील प्रेम शृंगार रसातून सादर करण्यात आले. रावणाने सीताहरण केल्यानंतर अरण्य भयभीत झाले होते हे भयानक रसातून त्यांनी सादर केले. पारंपरिक रागांचा संगम असलेल्या या रचनेत कर्नाटकी संगीताची अनुभूती येत होती. बरखा तनवीर आणि उदिता घोष यांच्या साथीने केलेले सादरीकरण अलौकिक होते. युद्धभूमीवरील राम आणि रावणाचे द्वंद्व रौद्र रसातून दाखवण्यात आले. शांतरसाचे नृत्यपूर्ण सादरीकरण विलोभनीय होते. पदलालित्य आणि अभिनयाने परिपूर्ण प्रस्तुती रसिकांसाठी पर्वणी ठरली.

दुसऱ्या प्रस्तुतीत 'सावेरी पल्लवी' बरखा आणि उदिता यांनी मिळून सादर केली. ताल आणि लय यांचे सूचिबद्ध सादरीकरण असलेली ही प्रस्तुती होती. हस्तमुद्रा आणि नृत्य अदाकारीचा अनोखा मिलाफ असलेल्या या प्रस्तुतीतून ओडिसी नृत्याचे अलौकिक दर्शन घडवले. नृत्य आणि नाट्याचा आविष्कार असलेली तिसरी प्रस्तुतीदेखील या दोघींनी सादर केली. 'ना जा यमुना लो सही'तून त्यांनी कृष्ण यमुनेकाठी राधेसह सर्व गोपिकांची खोड काढण्यासाठी थांबलेला आणि गोपिका राधेला यमुनातीरी जाण्यापासून थांबवण्याचा प्रयत्न करतात, असे दाखवण्यात आले. संकर्णवर्णा रागातील रचना एकतालात बांधण्यात आली होती. शेवटची 'महाकाली' प्रस्तुती अनिता यांनी सादर केली. ओडिसी नृत्यांगना महादेवी कालीची आराधना आणि जीवनाचे सत्य दाखवणारी प्रस्तुती होती. हातात गदा, चक्र, त्रिशूल असलेल्या देवीची विविध रूपे यातून दाखवण्यात आली.



नवरसांचे सादरीकरण करताना नृत्यांगना अनिता बाबू. छाया : अरुण तळेकर

घुंगरांच्या मंजूळ स्वरांमध्ये नृत्यांगनांनी रंगमंचावर हळुवार प्रवेश करत शिव आणि नटराज स्तुती प्रस्तुत केली. 'मंगलम्' प्रस्तुतीतून पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश आदींना वंदन करुन 'सर्व मंगल घडू दे' असे आवाहन करण्यात आले.

सिटी वुमेन | रविवार, ५ जानेवारी २०१४ | औरंगाबाद. | दिव्य सिटी .४

**औरा नृत्योत्सव** | दशावतार आणि शिवपंचाक्षराचा ओडिसी नृत्याविष्कार

# सिद्धी, शुभ्रताचे रंगले नृत्य

प्रतिनिधी | औरंगाबाद

घुंगरांच्या मंजूळ स्वरांमध्ये नृत्यांगनांनी रंगमंचावर हळुवार प्रवेश करत शिव आणि नटराज स्तुती करण्यात आली. कवी जयदेव यांनी ११ व्या शतकात रचलेल्या 'गीत गोविंदम्'मधील 'दशावतार' रचनेचा नृत्याविष्कार सिद्धी वाईकर, शुभ्रता त्रिपाठी, दिव्या शर्मा, नामहा मुजुमदार आणि ध्रुवी जैन या नृत्यांगनांनी सादर केला.

औरा औरंगाबाद आणि महागामी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या नृत्य जागरण शृंखलेत शनिवारी (४ जानेवारी) मुंबईच्या कैशिकी नृत्य भाषा समूहाच्या कलावंतांनी ओडिसी नृत्याचा नजराणा सादर केला. 'नागेंद्र भाराय त्रिलोचनाय' या शिववंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गुरू आदि शंकराचार्यांनी रचलेल्या स्तोत्रावर आधारित रचनेतून भगवान शंकराची स्तुती करण्यात आली. तालांच्या साथीबरोबर गुरू केलुचरण महापात्रा यांनी अभिनय पदात गुंफले. राग किरवाणी आणि खेमका ताल (झुला ताल) यांच्या आधारे रंगत जाणारी 'पल्लवी' ही प्रस्तुती सादर करण्यात आली. यानंतर 'दशावतार' कलाकृती लक्षवेधी ठरली.

'प्रलय पयोधी जले' नृत्यकृतीमध्ये राधाकृष्णाचे दैवी प्रेम आणि दैत्यांपासून रक्षणासाठी भगवानाने घेतलेला दशावतार दाखवण्यात आला. ११ व्या शतकातील संत कवी जयदेव यांनी लिहिलेल्या 'जय गोविंदम्' मधील पहिल्या श्लोकातील हे वर्णन होते. गुरू केलुचरण महापात्रा यांनीच रचनेला नृत्यात रूपांतरित केले. शेवटच्या 'मंगलम्' प्रस्तुतीतून करण्यात आले. यामध्ये पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश आदींना वंदन करून 'सर्व मंगल घडू दे' असे आवाहन करण्यात आले. 'भूमी मंगलम्, उदक मंगलम्, अग्नी मंगलम्' अशा मंगलमयी सुरावटींमध्ये असलेली ही रचना होती. सादरीकरणात या नृत्यांगनांचा सहभाग होता.



महागामीच्या औरा नृत्योत्सवात मुंबईच्या कैशिकी नृत्य भाषा समूहाच्या कलावंतांनी ओडिसी नृत्याचा नजराणा सादर केला. छाया : दिव्य मराठी

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
AURANGABAD, SUNDAY 1 DECEMBER 2013
NEWS



Artistes perform 'Mohiniyattam' during the Aura dance festival at MGM's Mahagami, in Aurangabad on Saturday.

सिटी वुमेन | रविवार. ८ डिसेंबर २०१३ औरंगाबाद. | दिव्य सिटी .४

भरतनाट्यम | 'कलिंग नर्तन तिल्लाना' कलाकृतीने रसिकांच्या डोळयांचे फेडले पारणे

# विष्णू दशावताराचा नृत्याविष्कार

प्रतिनिधी | औरंगाबाद

आंध्र प्रदेशातील सतराव्या शतकातील रचनाकार उत्तू काडू भागवतार्ह यांनी तालाची चमत्कृती आणि गतिभेद याचा सुरेख संगम साधून रचलेली 'कलिंग नर्तन तिल्लाना' ही कलाकृती सादर करण्यात आली. पुणे येथील प्रख्यात भरतनाट्यम नृत्यांगना अरुंधती पटवर्धन यांनी सायली पवार आणि सोनाली शेवाळे यांच्या साथीने केलेले 'विष्णू अवतार'चे सादरीकरण भरतनाट्यमचे अनोखे दर्शन घडविणारे होते.

'औरा' औरंगाबाद या उपक्रमाअंतर्गत . महागामीच्या 'द्यावापृथ्वी' मंचवर सुरू असलेल्या नृत्य जागरणात शनिवारी (७ डिसेंबर) भरतनाट्यमच्या प्रस्तुती सादर करण्यात आली. पुष्पांजलीने सादरीकरणाला सुरुवात झाली. 'गंभीर नटई' रागातील खंडचापू तालातील या रचनेतून भगवंताला पुष्पार्पण करण्यात आले. त्यानंतर 'खंड आलारिपूतून' पदन्यास दाखवण्यात आला. 'विष्णू दशावतार' या अर्ध्या तासाच्या अभिनय आणि पदलालित्याने परिपूर्ण नृत्याविष्काराने रसिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. यामध्ये 'जय जगदीश हरे' बोलांत ही रचना बांधलेली होती. यानंतर झालेल्या 'कलिंग नर्तन तिल्लाना' ही रचना कल्याणी, ब्यागडा, दरबार, देक, रेवती, हिंदोळम, खमाज, मध्यवती आणि नीलांबरी आदींच्या रागांमध्ये निबद्ध होती. यामध्ये बाळकृष्णाने कालिया नागावर केलेले अद्वितीय नृत्य लीलया सादर करण्यात आले. अतिशय अर्थवाही असलेली ही रचना १० वर्षांपूर्वी कर्नाटकी शास्त्रीय गायिका अरुणा साईराम यांनी प्रथमतः सादर केल्यानंतर भरनाट्यममध्ये करण्यात येऊ लागली. अरुंधती पटवर्धन यांनी शेवटची गुरूबद्दलचा आदर व्यक्त करणारी 'गुरु मैं तो एक निरंजन दुजे के संग नही जाऊ जी' या कुमार गंधर्वांनी रचलेल्या निर्गुणी भजनाच्या रचनेने नृत्योत्सवाची सांगता झाली.



'कलिंग नर्तन तिल्लाना' कलाकृती सादर करताना अरुंधती पटवर्धन, सायली पवार आणि सोनाली शेवाळे. छाया : रवी खंडाळकर

देवतांची स्तुती आणि पौराणिक प्रसंगासह शिवतांडव प्रस्तुत करताना विलोभनीय नृत्याविष्कारला रसिकांनी दाद दिली.

मराठवाडा | महाराष्ट्र टाइम्स aur.mtonline.in | औरंगाबाद ■ रविवार, १५ डिसेंबर २०१३ www.facebook.com/abdmata | ३

चंद्रकांत थोटे



भरतनाट्यम्

औरा औरंगाबाद नृत्यमहोत्सवात पुणे येथील प्रिया निमकर-जोशी यांच्या शिष्यांनी भरतनाट्यम् सादर केले.

सिटी वुमेन | शनिवार. ७ डिसेंबर २०१३ औरंगाबाद. | दिव्य सिटी .४

औरा नृत्योत्सव | पुण्याच्या युवा कलावंत अमृता गोगटे यांचा विलोभनीय पदविन्यास


# शिवतांडव अन् बुद्धवंदना

प्रतिनिधी | औरंगाबाद

देवतांची स्तुती आणि पौराणिक प्रसंगासह शिवतांडव आणि बृद्धवंदना प्रस्तुत करताना विलोभनीय नृत्याविष्कारला रसिकांनी दाद दिली. शुक्रवारी (६ डिसेंबर) महागामीच्या औरा नृत्योत्सवात पुण्याच्या युवा कलावंत अमृता गोगटे यांचा 'गतभाव' आणि 'ताल रुद्र' या पदविन्यासाने रसिकांना मोहिनी घातली.

नृत्य जनजागृती बरोबरच पर्यटकांना कार्यक्रमांचा आस्वाद घेता यावा यासाठी महागामी आणि सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने 'औरा' औरंगाबाद या ३ महिन्यांच्या नृत्योत्सवाला सुरुवात झाली असून त्यांची दुसरी शृंखला शुक्रवारी प्रस्तुत करण्यात आली. कथ्थक परंपरेप्रमाणे 'शिवस्तुतीने' प्रस्तुतीला सुरुवात करीत अमृता आणि शीतल लालव्हे नृत्यांगनांनी असाधारण नृत्याविष्कार पुढील तासाभरात आपल्यासमोर अवतरणार असल्याचे रसिकांना सांगितले. हिंदोल राग आणि चौतालातील ही रचना 'शंकर महादेव' या बोलांमध्ये बांधण्यात आली होती. पारंपरिक धृपदमध्ये शिवस्तुतीत समुद्र मंथन, मदन दाह हे प्रसंग सादर केले. यानंतर अमृताने 'ताल रुद्र' या ११ ताल असलेली प्रस्तुती सादर केली. अमृताने प्रस्तुत केलेला 'गतभाव' कथ्थक नृत्यप्रकार वेधक ठरला. अमृताने 'जटायूमोक्ष'चा प्रसंगात सीतेची रावणापासून सुटका करताना जटायू कशा पद्धतीने जखमी झाला हा प्रसंग रसिकांसाठी रोमांचक ठरला.

कथ्थक नृत्यात 'तराणा' मध्ये तांडव आणि लास्य हे शंकराचे भाव प्रकट करण्यात आले. राग जोनपुरी आणि त्रितालातील या रचनेतील 'देरेना, तानाना नादिर दिर' या पद्धतीने बसवण्यात आलेल्या तराण्यामध्ये देवी पार्वतीचे उत्साहपूर्ण, सौंदर्यपूर्ण नृत्य, तर शंकराचें महाभीषण तांडव यांचा संगम होता. शीतल, अमृतासह ईशा फडके आणि राधा जोशी या चारही नृत्यांगनांच्या लीलांना रसिकांनी दाद दिली. 'बुद्धस्तुती' नृत्यांगनेने अप्रतिम पद्धतीने सादर केली. सिद्धार्थ गौतमांचा बोधिवृक्षाखाली बसून दिव्य ज्ञान पर्यंतचा हा प्रवास दाखवण्यात आला.



बुद्धवंदना प्रस्तुती करताना पुणे येथील नृत्यांगना अमृता गोगटे, शीतल लालव्हे आणि राधा जोशी. छाया : अरुण तळेकर

पदन्यासातून नृत्यवैभव दाखवणाऱ्या 'मंगलम्' या प्रस्तुतीद्वारे नृत्यातील गती, लयबद्ध संचलन, नृत्यकौशल्य आणि ताकदीची साधना दिसून आली.

सिटी वुमेन | शनिवार, २८ डिसेंबर २०१३ | औरंगाबाद | दिव्य सिटी .४

औरा नृत्योत्सव | 'हरिनारायण कौत्वमे' मधून विष्णूच्या १० रूपांचे प्रकटीकरण

# मुंबईच्या नृत्यांगनांनी जिंकली मने



नृत्य सादर करताना मुंबईच्या सर्फोजीराजे भोसले केंद्राच्या नृत्यांगना.

प्रतिनिधी | औरंगाबाद

औरा औरंगाबाद आणि महागामीच्या यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नृत्योत्सवात शुक्रवारी (२७ डिसेंबर) मुंबईच्या सर्फोजीराजे भोसले केंद्राच्या नृत्यांगनांनी नृत्याविष्काराची अनुभूती रसिकांना दिली. 'अधरम मधुरम, वदनम मधुरम' या मधुराष्टकम प्रस्तुतीने रसिकांची मने जिंकली. 'हरिनारायण कौत्वमे' या विष्णुकौत्वुकममध्ये भगवान विष्णूंची विविध १० रूपे नृत्यांगनांनी प्रकट केली.

'महागणपती' या नाटाई रागातील आदितालात बांधलेल्या गणेशस्तुतीने त्यांनी कार्यक्रमाला सुरुवात केली. 'ब्रह्मसंधी कौत्वकम' या तिश्रएकम रागातील रचनेतून निबद्ध ब्रह्मदेवालाही वंदन करण्यात आले. सावित्री, जावित्री आणि सरस्वती या ब्रह्मपत्नी आणि वेदांबद्दलचे वर्णन यात सादर करण्यात आले. तंजावर घराण्याच्या भरतनाट्यम नृत्यगुरू आणि सर्फोजीराजे भोसले केंद्राच्या संचालिका डॉ. संध्या पुरेच्या यांच्या शिष्यांनी ९ नृत्यप्रस्तुतींचे सादरीकरण केले. 'हरिनारायण कौत्वमे' या रचनेत विष्णूच्या प्रत्येक रूपाचे सौंदर्य आणि कर्तृत्व नृत्याभिनयातून दाखवण्यात आले. 'तट वन मुनी जन' या नटराज कौत्वुकममध्ये नृत्याची देवता नटराजाची स्तुती दाखवण्यात आली. हंसध्वनी रागात बांधलेली ही रचना आदितालात निबद्ध होती. 'जतिस्वरम' या शुद्ध नृत्यप्रकारात विविध शिल्पाकृती दाखवण्यात आल्या. शिवशंकर आणि पार्वती, कृष्ण आणि गोपिका, दर्पण सुंदरी, विष्णूंचे दशावतार अशा सर्व शिल्पाकृती नृत्यातून सादर केल्या. खमाज राग आणि चतुश्र रूपक तालातील प्रस्तुती नृत्य-शिल्पांचा अलौकिक संगम होती. महाप्रभू वल्लभाचार्य यांनी रचलेल्या 'मधुराष्टकम'ला वसंत आणि कल्याणी या मुख्य रागांसह इतर रागांच्या मालिकेत बांधण्यात आले. 'नमस्तेऽतु महामाये, श्रीपीठे सूरपूजिते' या प्रस्तुतीतून महालक्ष्मीच्या विराट रूपाचे दर्शन घडले. शंकराभरणम राग आणि तिश्र गती आदितालातील या रचनेतून नृत्यसामर्थ्य नृत्यांगनांनी दाखवून दिले. पदन्यासांतून नृत्यवैभव दाखवणाऱ्या 'मंगलम' या प्रस्तुतीद्वारे नृत्यातील गती, लयबद्ध संचलन, नृत्यकौशल्य आणि ताकदीची साधना दिसून आली. चित्रा दळवी, राधिका पाटकर, पुष्करा देवचके, मंदिरा जोशी, सुहानी धानकी आणि दिशा वाघेला यांनी नृत्य सादर केले. महागामीच्या संचालिका पार्वती दत्ता यांची उपस्थिती होती.